# विद्यार्थ्यांमधें

१९८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२११

★

जयप्रकाश नारायण

अनुवादक :
कुंदर दिवाण

REFBK-0006976

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# विद्यार्थ्यांमधें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

जयप्रकाश नारायण

अनुवादक :

कुंदर दिवाण

REFBK-0006976

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम सेवा मंडळ
परंधाम विद्यापीठ,
पो. पवनार, वर्धा

किंमत चार आणे

मुद्रक :
**मोहनलाल भट्ट**
राष्ट्रभाषा प्रेस,
हिन्दीनगर, वर्धा

८२०६

# तेजस्वी विद्येची साधना

जेव्हां मी स्वतःला विद्यार्थ्यांमध्यें पाहतों तेव्हां मला फार आनंद वाटतो. याचें कारण हें की तुमची आणि माझी जात एक आहे. तुम्ही विद्यार्थी आहां, मी हि विद्यार्थी आहें. दररोज कांहीं-ना-कांहीं नवीन ज्ञान मी मिळवीत असतों.

युनिव्हर्सिटींत राहून तुम्ही कांहीं ज्ञान मिळवितां आणि मानतां कीं हें ज्ञान आपल्याला आपल्या भावी जीवनांत लाभदायी होईल. वस्तुतः जिथें युनिव्हर्सिटीचें ज्ञान संपतें तिथून विद्येचा आरंभ होतो. युनिव्हर्सिटीचें अध्ययन पूर्ण करण्याचा अर्थ इतका च कीं आतां तुम्ही आपल्या प्रयत्नानें विद्या मिळवूं शकतां; तुम्ही निजाधार झाला, निराधार राहिला नाहींत.

तुम्ही बाल्यावस्थेंत आहां, बाल-पदवी तुम्हांला आहे. बाल म्हणजे बलवान्. हें सारें जग हातांतील मातीसारखें आहे, तिला जसा आकार मी देऊं म्हणेन तसा देईन, असें तो मानतो. तात्पर्य, तुम्ही आपली बुद्धि स्वतंत्र ठेवली पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या विषयीं माझी अशी तकरार आहे कीं त्यांना स्वतंत्रपणें कुठल्या हि गोष्टीचा विचार करूं दिला जात नाहीं. अलीकडे प्रत्येक सरकार-

कडून रेडीमेड विचार विद्यार्थ्यांच्या बुद्धींत कोंबून देण्याचा प्रयत्न होत आला आहे. मग सरकार सोशलिस्ट असो, कम्युनिस्ट असो वा इतर कोणी इष्ट वा अनिष्ट असो. पण ही पद्धत चूक आहे. एक काळ असा होता कीं जेव्हां गुरु आपल्या विद्यार्थ्यांना पूर्ण विचार-स्वातंत्र्य देत. ते आपल्या शिष्यांना सांगत--आमच्या दोषांचें नव्हे तर आमच्या चांगल्या गोष्टींचें च अनुकरण करा. गुरूची एखादी गोष्ट जर शिष्यानें विचारपूर्वक मानायची नाहीं असें ठरविलें, तर गुरूला त्या आपल्या शिष्याचा अभिमान वाटला पाहिजे. सध्यां तर जो उठतो तो आपलें च म्हणणें चालवूं पाहतो. विद्यार्थ्यांवर हे एक फार मोठें संकट आहे. जणूं काय हे लोक विद्यार्थ्यांचें यंत्रीकरण करूं पाहतात. तुम्हांला अशा कुणा यंत्राचा भाग बनतां कामा नये. तुम्हांला संत बनायचें आहे, पांथ नव्हे. सत्याचा जो उपासक तो 'संत' आणि कुठल्या तरी आयत्या तयार मार्गाचें जडवत् अनुसरण करतो तो 'पांथ'. तुम्ही वेगवेगळीं युनियन्स-मंडळें करतां. या मंडळांत राहण्यासाठीं एका खास विचार-सरणीचें अनुसरण करण्याची गरज असते. मी तुम्हांला विचारतों, वाघांचें कधीं कुठें मंडळ असतें? मंडळ मेंढ्यांचें असतें. माझें असें म्हणणें नाहीं कीं तुम्ही कोणाशीं सहकार च करूं नये. चांगल्या गोष्टींबाबत सहकार अवश्य करायचा आहे. पण विचार स्वतंत्र ठेवायचे आहेत; आणि सत्यदर्शनासाठीं त्यांत आवश्यक परिवर्तन करण्यास सदा तयार रहायचें आहे. याला च सत्य-निष्ठा म्हणतात, आणि बलवान् बनण्याचा हा च मार्ग आहे.

बलवान् बनण्यासाठीं आणखी एक आवश्यक गोष्ट आहे--संयम. मी इंद्र आहे, हीं इंद्रियें माझ्या शक्ति होत. त्यांच्यावर माझा ताबा असला पाहिजे. विद्यार्थी-दशेंत ही संयमाची महान् विद्या तुम्हीं शिकून घेतली पाहिजे. जेव्हां तुम्हांला संयमाच्या शक्तीचा संग्रह करतां येईल तेव्हां च तुम्हांला एकाग्रता हि लाभेल. ही जीवनाची एक महान् शक्ति आहे.

तुम्ही डोळा आणि पाय यांचा भेद ओळखा. डोळा साऱ्या जगाच्या निरीक्षणासाठीं उघडा पाहिजे. त्याला स्वैर संचाराची पूर्ण मोकळीक असली पाहिजे. परंतु पाय निश्चित मार्गानें च चालले पाहिजेत. तर च प्रवास होईल. पावसाचें पाणी वेगवेगळ्या दिशांनीं जिकडे तिकडे वाहून गेल्यास नदी होणार नाहीं. नदी होण्यासाठीं निश्चित दिशा हवी. संयमाची शक्ति या दृष्टांतावरून ओळखून घ्या.

एकदां मला विद्यार्थ्यांच्या 'तरुण-उत्साही मंडळां' त जावें लागलें. मीं म्हटलें उत्साही मंडळ तर वृद्धांचें असलें पाहिजे. ज्या राष्ट्राला आपल्या विद्यार्थ्यांना उत्साहित करण्याची गरज पडते तें राष्ट्र खलास झालें म्हणून समजा. तरुणांना धृतीची आवश्यकता आहे. तेव्हां च उत्साह टिकतो, आणि कार्यक्षम होतो. गीतेंत म्हटल्याप्रमाणें धृति आणि उत्साह मिळून कर्म-योग होतो, आणि तुम्हांला व्हायचें आहे कर्म-योगी.

एक प्रश्न नेहमीं विचारला जातो—विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घ्यावा किंवा नाहीं ? विद्यार्थ्यांनीं आत्मनीतींत प्रवीण व्हायला पाहिजे. प्रत्येक बाबतीत जागरूक राहून त्यांनीं आपली नीति ठरविली पाहिजे. राज-नीतींत विद्यार्थ्यांनीं साक्षी आणि अध्यक्ष होऊन रहावें. आपण अध्यक्ष त्याला म्हणतों ज्याची दृष्टि साऱ्या जगावर राहते. विद्यार्थीदशेंत तुम्ही जीवनाशीं संबंध असलेल्या साऱ्या विषयांचें निरीक्षण, परीक्षण करीत रहा, आपले निर्णय करीत रहा; आणि वेळ आली म्हणजे त्यांची अंमलबजावणी करा.

कर्म-योगी होण्यासाठीं विद्यार्थ्यांना कांहीं-ना-कांहीं निर्माणकार्य करीत राहिलें पाहिजे. निर्मितीशिवाय निःसंशय ज्ञान हि होत नाहीं. प्रयोगांतून मिळालेलें ज्ञान च निःसंशय ज्ञान असतें. मी विद्यार्थ्यांना विचारतों— तुम्हांला स्वयंपाक करतां येतो कां ? ते म्हणतात–'नाहीं. आम्हांला फक्त खाणें येतें. स्वयंपाक करणें तर मुलींचें काम आहे,'. स्वयंपाक करणें मुलींचें काम असेल तर खाणें हि मुलींचें च काम राहूं द्या. तुम्ही आपल्यासाठीं

'ज्ञानामृतं भोजनं' असूं द्या. ज्या लोकांनीं मुलींचें आणि मुलांचें कार्य अशा रीतीनें विभागलें, त्यांनीं दोहोंना गुलाम बनविण्याची तऱ्हा शोधून काढ़ली आणि ज्ञानाला पुरुषार्थहीन बनविलें.

श्रीकृष्ण लहानपणीं हातांनीं काम करी, मेहनत मजुरी करी. म्हणून च गीतेंत इतक्या स्वतंत्र प्रतिभेचें दर्शन होतें! आपल्याला भाराभर विद्या मिळवायची नाहीं. तेजस्वी विद्या मिळवायची आहे. ज्या विद्येंत कर्तृत्व-शक्ति नाहीं, स्वतंत्रपणें विचार करण्याची बुद्धि नाहीं, साहसाची वृत्ति नाहीं, ती विद्या निस्तेज होय. तुम्ही सर्वांनीं तेजस्वी विद्या मिळविण्याची वृत्ति राखावी अशी माझी इच्छा आहे.

ऑगस्ट १९४८ —**विनोबा**

# विद्यार्थ्यांमध्यें

सर्वोदय म्हणजे च सर्वांचा उदय, सर्वांचें भलें आणि, सर्वांची प्रगति. परंतु "सर्वांचें भलें होऊं नये, किंवा पन्नास टके लोकांचें भलें व्हावें आणि पन्नास टके लोकांची वाईट स्थिति असावी, अथवा नव्वद टके लोकांचें भले व्हावें आणि दहा टके तसे च रहावेत" अशा प्रकारचा विचार करणारा समाजांत क्वचित च कोणी असेल. मनुष्य-समाज बरा च प्रगत झाला आहे त्यामुळें सगळे च म्हणतील कीं सर्वांचें भले होवो. म्हणून सर्वांचें भलें कसें होईल याचा विचार आपण केला पाहिजे.

आपल्यापैकीं प्रत्येक जण असा च विचार करूं लागला कीं " माझें च भलें व्हावें, मला माझ्या स्वत:च्या च भल्याचा मतलब, स्वत:च्या भल्यासाठीं च मला पुरुषार्थ करायला पाहिजे, उद्यमीं व्हायला पाहिजे" तर समजून चला कीं सर्वांचें भलें होणार नाहीं. आज उदारमतवादाचा जमाना निघून गेला आहे. त्या जमान्यांत सर्व-साधारण समजूत होती कीं समाजांतील प्रत्येक जण आपआपल्या भल्यासाठीं प्रयत्न करील तर त्यांतून आपोआप सर्वांचें भलें होईल. त्या जमान्याचें सारें अर्थ-शास्त्र, राज्य-शास्त्र आणि समाज-शास्त्र

या च एका धारणेवर बनलें होतें, आणि त्याची छाप आजतागायत समाजावर कायम आहे. परंतु इतिहासानें हें दाखवून दिलें आहे कीं हा विचार अतिशय भ्रामक होता. या विचारावर व्यक्तीचें आणि समाजाचें जीवन रचण्यांत आलें; त्यांत सर्वांचें भलें झालें नाहीं. कांहींचें झालें आणि कांहींचें झालें नाहीं, हें च जगाला दिसून आलें. तरी हि प्रत्येकानें आपल्या भल्याचा विचार करावा अशी च समाजाची धारणा आणि सामाजिक मूल्य असल्यामुळें ही स्थिति बदलण्याचा कांहीं मार्ग हि त्यांना सांपडत नव्हता. आमचा हि तो च उद्देश अथवा ती च धारणा असेल आणि त्या च बरोबर समाजांत कुणी हि उपाशी व उघडा नागडा राहूं नये, सर्व सुखी व्हावेत, अशी इच्छा असेल, तर आपण काय केलें पाहिजे ? महात्मा गांधींनीं या प्रश्नाचें अगदीं स्पष्ट उत्तर दिलें आहे. ते म्हणतात " आपण जर सर्वांचें भलें इच्छीत असूं तर आपल्याला आपलें भलें विसरून सर्वांचें भलें मनांत वागवलें पाहिजे. आम्ही आमच्या स्वार्थासाठीं झटावें आणि तुम्हीं तुमच्या स्वार्थासाठीं—हा आमच्या जीवनाचा केव्हां हि नियम होतां कामा नये. तसें झाल्यास थोड्या लोकांचा तेवढा स्वार्थ साधेल, सर्वांचा नाहीं. समाजांत परस्परांत नाना प्रकारचे संघर्ष होतील. कलह, अन्याय, शोषण, विषमता आणि नाना प्रकारचे सामाजिक रोग, उत्पन्न होतील. त्याचा साक्षी आजचा इतिहास आपल्या समोर उभा आहे. म्हणून जर खरोखर आम्ही मानत असूं कीं ज्यांत सर्वांचें भलें आहे असा एक समाज बनावा तर प्रथम आपला स्वार्थ आपण विसरून जायला पाहिजे. सर्वांचें भलें होईल तर आपलें हि भलें होईल, कारण सर्वांत आपण हि आहों. परंतु जर प्रत्येक

जण म्हणेल कीं आमचें भलें झालें तर सर्वांचें भलें होईल, तर तें खरें नाहीं.

म्हणून पहिली गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं जर आपण सर्वोदय इच्छीत असूं, सर्वांचें भलें इच्छीत असूं, तर आपल्याला आपली दृष्टि बदलली पाहिजे. आपल्यावरील आपली दृष्टि दूर करून ती दुसऱ्याकडे वळवली पाहिजे. आपल्या स्वार्थाची चिंता करणें अथवा तो साधण्यासाठीं झटणें हें आपलें कर्तव्य नसून दुसऱ्यांच्या स्वार्थासाठीं, सगळ्या समाजाच्या भल्यासाठीं झटणें, हें च आपलें कर्तव्य होय. आपल्याला आपल्या स्वार्थाचा त्याग करावा लागेल; जर व्यक्तिगत स्वार्थाचा, त्या च प्रमाणें कंपू, गट, वर्ग, आणि राष्ट्र, यांच्या स्वार्थांचा त्याग झाला नाहीं, तर सर्वोदय होऊं शकणार नाहीं. त्या स्थितींत एका राष्ट्राचा उदय तर दुसऱ्याचा अस्त, एका वर्गाचा उदय तर दुसऱ्या वर्गाचा अस्त, असें च चित्र बनणार. आजपर्यंत जगांत जितके सामाजिक संघर्ष अथवा समाज-परिवर्तनाचे प्रयोग झाले, मग ते भारत, चीन, ग्रीस, रोम, आणि आधुनिक युरोप, यांच्यांत झालेले असोत, अथवा दुसऱ्या देशांत, त्या सर्वांच्या मुळाशीं स्वार्थ च होता. सर्वत्र एका गटाचा वा एका वर्गाचा स्वार्थ, दुसऱ्या गटाच्या अथवा दुसऱ्या वर्गाच्या स्वार्थाशीं भिडला, टक्करला आणि त्यांतून कांहीं नवीन परिवर्तन झालें, समाजाचें रूप बदललें, परंतु सर्वोदय नाहीं झाला. कुणा एका वर्गाचा स्वार्थ साधला तर दुसऱ्या वर्गाचा फसला. सर्वोदय आजपर्यंत झाला नाहीं. स्वार्थांच्या संघर्षांतून सर्वोदय निष्पन्न होऊं शकत नाहीं.

सर्वोदय-समाज जेव्हां बनेल तेव्हां समाजांतील सर्व लोक आपआपल्या स्वार्थासाठीं न जगतां दुसऱ्याच्या, समाजाच्या

किंवा सर्वांच्या स्वार्थासाठीं जगतील, लढतील अथवा मरतील. म्हणजे सर्वोदय-समाज एक असा समाज होईल कीं जो निःस्वार्थतेच्या पायावर उभा असेल. तो व्यक्तिगत किंवा आंशिक स्वार्थावर उभा न राहतां सर्वांच्या समग्र स्वार्थावर उभा होईल. वस्तुतः त्याला स्वार्थ म्हणणें हि उचित होणार नाहीं, परंतु म्हटलें तरी कांहीं हरकत नाहीं. तात्पर्य, प्रत्येक व्यक्ति समाजासाठीं झटते आहे असें सर्वोदय-समाजाचें चित्र बनेल. संघर्षांतून निःस्वार्थता उत्पन्न होऊं शकत नाहीं. आजपर्यंत असें च मानलें गेलें कीं समाज-क्रांतीसाठीं स्वार्थाच्या संघर्षांतून च प्रेरणा मिळूं शकते. आजपर्यंत सर्व क्रांतिकारकांची ही च धारणा राहिली आहे. परंतु इतिहास साक्षी आहे कीं असल्या क्रांतींतून जो समाज निर्माण झाला, तो सुद्धां स्वार्थावर च उभा राहिला. एका वर्गाचा स्वार्थ गेला आणि दुसऱ्या वर्गाचा आला.

समजा कीं मजूर वर्ग विजयी झाला, म्हणून असें थोडें च झालें कीं मालकांच्या अथवा भांडवलदारांच्या विरुद्ध आपल्या स्वार्थासाठीं लढणाऱ्या सर्व मजुरांमध्यें आपसांत स्वार्थाचें कांहीं भांडण च उरलें नाहीं. स्वार्थाचें भांडण तर केवळ दुसऱ्या वर्गाशीं होतें. परंतु त्या विजयी झालेल्या वर्गांतून स्वार्थाची भावना नाहीशीं झाली नाहीं आणि होणें शक्य हि नाहीं. कारण, मजूर स्वार्थासाठीं झगडत आहे. मजूर वर्गाचे लाखों करोडों मजूर आपल्या स्वार्थासाठीं लढत आहेत. ते समजतात कीं मालकांच्या विरुद्ध आम्हा करोडों मजूरांचे स्वार्थ समान आहेत. म्हणून एका झेंड्याखालीं एकत्रित होऊन ते लढतात. परंतु तो लढा संपला, तरी स्वार्थाची भावना आपोआप नष्ट होत नाहीं; ती कायम च राहते आणि

मग मालकांशीं लढा देऊन—तो सनदशीर लढा मग शांतिमय झाला असो अथवा रक्तरंजित झाला असो—विजयी झालेला मजूर काय, शेतकरी काय, प्रत्येकजण आपसांत झगडूं लागतो.

माझा संबंध मजुरांशीं आणि त्यांच्या चळवळींशीं बरा च राहिला आहे. पूर्वीं मजुरांचा उद्घोष होता, आणि आज देखील आहे, कीं 'समाजांत समतेचें राज्य होवो, विषमता मिटो.' यावर मी रेल्वेच्या मजुरांना विचारतों कीं 'तुम्हीं विषमता मिटावी असें इच्छितां, तर तुमच्यांत असलेले नाना प्रकारचे क्लास आणि ग्रेड यांना तुम्ही कां मिटवीत नाहीं ? जर तुम्ही विषमतेचे विरोधक आहांत, तर आपसांत च विषमता कां ठेवतां ? कुणाचें वेतन रु. ६५ पासून सुरू होऊन १३५ पर्यंत जातें, कुणाचें रु. ८० पासून सुरू होऊन २१० पर्यंत, आणि कुणाचें रु. १२५ पासून सुरू होऊन ३५० पर्यंत जातें—याचा अर्थ काय ? शेंवटीं तुम्हीं हा भेद कां ठेवला ?' तर ते एकदम उत्तर देतात, "हें कसें होऊं शकेल ? आमचें हें काम 'स्किल्ड' (कुशलतेचें) आहे. त्यांचें तें काम 'अन स्किल्ड' (साधें बिन कुशलतेचें) आहे." अशी ते दुनियाभरची चर्चा करीत. मजूर—मग ते कापड गिरण्यांतील असोत, टाटाच्या लोखंड-पोलादाच्या कारखान्यांतील असोत अथवा कोळशाच्या खाणींतील असोत—मालकांच्या, सरकारच्या, विरुद्ध ते सारे एक आहेत. एका ट्रेड यूनियनचे ते मेंबर आहेत. संप झाला तर सर्व संपावर जातील. प्रदर्शन करायचें झालें तर सर्व च प्रदर्शन करतील. सर्व जण गोळा होऊन उद्घोष करतील कीं "उच्च-नीच, गरीब-श्रीमंत हा भेद नष्ट झाला पाहिजे." परंतु त्यांच्यांत आपसांत च असलेला भेद पुसून टाकायला ते तयार नाहींत.

विनोबांचा पडाव भागलपूरला असतांना कॉलेजचे कांहीं अध्यापक त्यांच्याकडे आले. अध्यापक म्हणाले "समाजांत समता आली पाहिजे, हें प्रत्येक समंजस माणूस आज सांगत आहे. समतेची सुरवात शिक्षण खात्यापासून झाली पाहिजे; कारण शिक्षण आमच्या राष्ट्रीय जीवनाचा पाया आहे. ज्या प्रकारचें शिक्षण मिळेल त्या प्रकारचें आम्ही बनूं, तसा च देश बनेल. या साठीं प्रथम शिक्षण खात्यापासून च समतेच्या प्रयोगाचा आरंभ झाला पाहिजे, ही आमची मागणी आहे. आम्ही इच्छितों कीं आमच्या प्रिन्सिपल साहेबांस (त्यांनीं सांगितलेला आंकडा आठवत नाहीं, पण धरून चला) रु. ५०० किंवा ७०० मिळतात आणि आम्हां लोकापैकीं कुणाला १५०, कुणाला १७५ तर कुणाला २०० मिळतात. हें ठीक नाहीं. हा भेद मिटवला पाहिजे." तेव्हां विनोबा म्हणाले कीं "तुम्ही जर असें मानतां आणि इच्छितां तर तें अगदीं सोपें आहे. तुम्हांला महिन्याच्या शेवटीं किंवा आरंभीं जेव्हां केव्हां पगार मिळत असेल, तेव्हां तुम्ही सर्व अध्यापक आपआपलें वेतन एक-त्रित करा, त्याची रास लावा आणि सारख्या प्रमाणांत तें वांटून घ्या, कीं झाली तुमच्यापुरती समता स्थापन ! सरकारकडून कायदा होईल, किंवा मॅनेजिंग कमिटीकडून होईल, तेव्हां च हें काम व्हावें, असें कां ? खरोखर इच्छीत असाल तर करा. मी देखील इच्छितों कीं सर्वांत प्रथम शिक्षणखात्यांत समतेची स्थापना व्हावी. परंतु शिक्षकांना सुद्धां कुणी दंडुक्याच्या जोरावर समतेचा धडा शिकवूं लागला, तर त्यांत काय सार ? काय महत्त्व ? समाजांत मार-झोड करून समता स्थापन झाली, तर त्यांतून विषमता अवश्य निघेल. मन समता मान्य करणार नसेल, तर त्यांतून विषमता कोणत्या-ना-कोणत्या प्रकारें उत्पन्न होणार च."

मी तुम्हांला हें सांगत होतों कीं जिथें आपण स्वार्थाची गोष्ट बोलतों, जिथें वर्ग-स्वार्थाची सुद्धां भाषा असते, तिथें एका ठराविक वर्गाच्या व्यक्ति आपआपल्या स्वार्थाचा च विचार करतात. सारा लढा जर स्वार्थासाठीं च लढला गेला, आम्ही आपलें सर्व तत्त्वज्ञान स्वार्थावर च उभें केलें, तर हें केवळ अशक्य आहे कीं जो गट, वर्ग, किंवा राष्ट्र, विजयी होईल त्यांत आपसांत स्वार्थाचें भांडण उभें होणार नाहीं--तें होणार आणि अवश्य होणार. आणि स्वार्थाचें भांडण राहून गेलें, तर सर्वोदय होणार नाहीं. जोंपर्यंत आम्ही हें समजत नाहीं कीं स्वार्थाचा परित्याग केल्यावर च आमचें, समाजाचें, किंवा सर्वांचें, भलें व्हायचें आहे; आणि जोंपर्यंत या आधारावर आमचा लढा चालत नाहीं, तोंपर्यंत सर्वोदय निष्पन्न होणार नाहीं.

तुमच्यापैकीं पुष्कळांच्या मनांत प्रश्न उठत असेल कीं विनोबा जें सांगत आहेत--जमीन वांटा, संपत्ति वांटा, एक एक हिस्सा देत चला, रुपयांत एक पैसा, दोन पैसे, एक आणा किंवा सहावा भाग, आपल्या आपल्या ऐपतीप्रमाणें देत चला,--ही कोणती क्रांति ? अशा प्रकारें काय होणार ? यानें गरिबीचा व श्रीमंतीचा प्रश्न कसा सुटणार ? याच्या तुलनेंत तुम्हांला जुन्या गोष्टी आठवत असतील कीं क्रांति तर तेव्हां होते जेव्हां गरीब आपलें संघटन करतात, श्रीमंतांपासून धन हिरावून घेतात आणि तें आपसांत वांटून घेतात. ते तें कायद्यानें हिरावून घेवोत अथवा राष्ट्रीयीकरण करून हिरावून घेवोत, समाजीकरण करून हिरावून घेवोत, सीलिंग करून हिरावून घेवोत अथवा तलवारीनें हिरावून घेवोत. आमच्या समोर क्रांतीचें एकमात्र चित्र म्हणजे हें. परंतु जर गरीब, शोषित,अथवा दलित, संघटित होऊन

आपल्या स्वार्थासाठीं शोषकांशीं हिंसेनें किंवा अहिंसेनें लढले तर त्या दोन्ही प्रकारच्या लढ्यांचा आधार स्वार्थ च राहील. मीं तुम्हाला समजावून सांगितलें च आहे कीं ही कांहीं खरी क्रांति नव्हे. मारामारी नि कापाकापी चालली आहे, घरें जाळलीं जात आहेत, कत्तली होत आहेत, संपन्न लोक लुटले जात आहेत, करोडोपतींचें धन वाटलें जात आहे, कारखान्यावर मजूर आणि जमिनीवर शेतकरी व मजूर कब्जा करीत आहेत, मोठी क्रांति होऊन राहिली आहे असें तुम्हांला वाटत असेल. परंतु जगांत अशा ज्या क्रांत्या झाल्या, त्यांतून अखेर निष्पन्न काय झालें ? त्यांच्यांतून क्रांतीचें खरें तत्त्व निघालें नाहीं, हें स्पष्ट आहे. स्वार्थी स्वार्थाची लढाई चालते. नुसता स्वार्थ जीवनांत उरतो. जीवनाचा आधार स्वार्थ होऊन बसतो. मग इंजिनियर म्हणतो, आम्ही हि मजूर आहों, मेकॅनिक म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, बिनकुशलतेचें काम करणारा म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, शिपाई म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, जनरल देखील म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, कारखान्याचा डायरेक्टर हि म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, सहकारी फार्मवर शेती करणारा शेतकरी म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों, कलेक्टिव्ह फार्मचा मॅनेजर म्हणतो कीं आम्ही हि मजूर आहों. आम्ही सर्वांनीं लढा देऊन जमिनीच्या, कारखान्याच्या आणि संपत्तीच्या मालकांपासून आपला हक्क हस्तगत केला आहे. परंतु यानंतर काय होतें ? इंजिनियर म्हणतो: "आम्हांला अधिक मिळालें पाहिजे; सामान्य मजुराला जितकें मिळतें तितकें च जर आम्हांला द्याल, तर म्हणावें लागेल कीं आम्हीं जी सगळी विद्या मिळवली आणि इंजिनियर अथवा उत्तम सायंटिस्ट होऊन आम्ही

आपल्या बुद्धिबळानें समाजाची जी सेवा करीत आहों तिची तुलना केवळ हातांनीं काम करणाऱ्या माणसांशीं तुम्हीं करीत आहां !" सैन्याचा जनरल म्हणतो: "वा ! जें अेक सामान्य सैनिकाला मिळतें तें च सेनापतीला हि मिळायचें हें कसें जमणार ? आम्हांला अधिक मिळायला पाहिजे. बंगला व मोटर असली पाहिजे, आम्हांला किती मोठें काम करायचें असतें. सगळ्या सैन्याचा कारभार पहायचा असतो." ह्या सगळ्या गोष्टी उत्पन्न होतात.

तात्पर्य कोणी मालक, भांडवलदार, जागीरदार अथवा जमीनदार राहिला नाहीं, एक वर्ग-हीन श्रमिक समाज बनून गेला. इतक्या ऊपर हि त्या समाजांतील एक मजूर म्हणतो कीं दुसऱ्या मजुरापेक्षां आम्हांला अधिक मिळालें पाहिजे. तो जें असें म्हणतो त्याचें कारण काय ? कारण हें च कीं तो लढा स्वार्थाच्या आधारावर झाला. समाजांतून स्वार्थाचा विचार नाहींसा झाला नाहीं, तर क्रांति काय झाली? मूल्यें तर बदललीं च नाहींत. भांडवलदार गेला आणि राष्ट्रीयीकरण आलें आणि त्याच्या जागीं एक फार मोठा ऑफिसर बसला. एक जनरल मॅनेजर अथवा एक डॉयरेक्टर बसला. त्याला हि तशा च सोयी मिळूं लागल्या, त्याच्या हातीं हि ती च सत्ता आली. नव्हे, तीहून हि अधिक सत्ता आली, तर मग काय क्रांति झाली ?

आजच्या क्रांतिकारकांच्या डोळ्यावर सारा चढला आहे. त्यामुळें त्यांना याच्यापुढें कांहीं दिसत नाहीं. त्यांना वाटतें बस, या शिवाय दुसरा कोणता मार्ग नाहीं. आम्ही आपल्या स्वार्थासाठीं वाटल्यास तलवारीनें लढावें वाटल्यास कायद्यानें, वाटल्यास सत्याग्रहानें पण लढावें आपल्या स्वार्थासाठीं ! सत्याग्रह आणि स्वार्थासाठीं ? विसंगत आहे हें. स्वार्थासाठीं का सत्याग्रह होऊं शकतो ?

स्वार्थ मुळीं तत्त्व च नाहीं. स्वार्थाचा लढा हा सत्याचा लढा होऊं च शकत नाहीं. परंतु सर्वोदयाचा लढा, सर्वांच्या स्वार्थाचा लढा, सर्व समाजाच्या स्वार्थाचा लढा होऊं शकतो. पण त्यांत समाजाचे तट पडत नाहींत.

आज तुमच्यासमोर क्रांतीचें एक नवीन दर्शन ठेवण्यांत येत आहे. गांधींनीं तें अगदीं स्पष्ट केलें आहे; परंतु शब्दांत आज त्याचें व्यावहारिक रूप आमच्यासमोर ठेवण्यांत येत आहे. क्रांति कशा प्रकारें होईल ? स्वार्थ सोडण्याची काय प्रक्रिया आहे ? समाजांत आम्ही आपला स्वार्थ सोडूं, तुम्ही आपला स्वार्थ सोडाल, करोडों लोक आपला स्वार्थ सोडतील आणि क्रांति होईल. हें कसें व्हायचें? ज्यांतून निःस्वार्थता निघेल, एक नवें सामाजिक मूल्य निर्माण होईल आणि स्वार्थाचें मूल्य नाहींसें होईल, असें हें स्वार्थ-परित्यागाचें आंदोलन कसें होणार ?

लोक आम्हांला विचारतात: "कळत नाहीं कीं तुम्ही ज्या लोकांच्यापाशीं पुष्कळ जमीन आणि पुष्कळ धन आहे त्या अमीर लोकांना समजावून समाजांत समता कशी काय आणणार ? तुमच्या केवळ समजावून सांगण्यानें च काय ते आपली हजारों एकर जमीन देऊन टाकतील ? आमच्याजवळ पांच हजार एकर जमीन आहे. आम्ही आपल्या मुलाबाळांसाठीं २० एकर जमीन ठेवून घेऊन बाकी सर्व देऊन टाकूं ! हें कधीं होण्याजोगें आहे काय ? तुम्ही स्वप्न तर पाहत नाहीं ? अशा प्रकारें कोणा कोट्यधीशाला तुम्हीं सहावा हिस्सा दान द्यायला सांगितला आणि समजा कीं त्यानें तो दिला, आपल्या जवळील ६ कोट संपत्तीपैकीं १ कोट रुपये देऊन टाकले, तर तेवढ्यानें काय झालें ? कोणती क्रांति झाली ?

क्रमांक ...१२. २८।२५ ता. ...निर्देश...
क्रमांक ७२९९ २८।२।५७

कोणती समता स्थापन झाली ? ५ कोट रुपयांचा मालक तर तो राहिला च. ही काय आहे चळवळ तुमची ?

मजूर तलवारीच्या बळावर त्याच्या घरांत घुसतात आणि सारें धन लुटून घेतात, हें आम्ही समजूं शकतों. अथवा हें हि आम्हांला समजूं शकतें कीं 'अमुक इतक्या पेक्षां कोणाजवळ अधिक धन राहणार नाहीं' असा पार्लमेंटमधें कायदा पास करून भांडवलावर निर्बंध घालण्यांत यावा. अशा प्रकारें संपत्ति आणि भूमि यांच्यावर मर्यादा घालणें शक्य आहे. अथवा हें हि आम्ही समजूं शकतों—राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें, इन्कमटॅक्स, सुपरटॅक्स लावण्यांत यावेत; ह्या साऱ्या गोष्टी आम्ही समजूं शकतों. गरीब तुम्हांला खुशाल देवोत. अमीर देखील थोडेसें कांहीं देतील. अशासाठीं देतील कीं गरिबांचा मोठा दाब पडत आहे. कांहीं विनोबांना देतील, कांहीं जयप्रकाश नारायणला देतील आणि छापण्यांत येईल कीं अमक्या-अमक्या शेटजीनें संपत्तिदान दिलें. त्याच्यायोगें समाजांत कांहीं त्याला आदर हि मिळेल आणि त्याचें कांहीं नांव हि होईल. तुम्हां लोकांना फसवण्यासाठीं तो कांहीं देऊन टाकील. परंतु यानें समाजाचें परिवर्तन कसें होणार ?"

याला माझें उत्तर हें कीं जे लोक अशा तऱ्हेची शंका घेतात त्यांना मुळीं ह्या आंदोलनाचा अर्थ च कळला नाहीं. विनोबा काय करूं पाहत आहेत, आणि महात्मा गांधी काय सांगून गेले, त्यांना कांहीं समजलें च नाहीं. तुम्हांला सांगूं का ? जेव्हां कोणी भूमीचें अथवा संपत्तीचें दान करतो तेव्हां आम्हांला मोठें आश्चर्य वाटतें.

आम्ही त्याला समजावून सांगतों, पण आमची अपेक्षा नसते कीं आमच्या समजावून सांगण्यानें तो आपली संपत्ति सोडून देईल; परंतु खरोखर च तो दान करतो. अनेक कोटयाधीशांनीं देखील संपत्ति-दान दिलेलें आहे. टाटा, खटाव किती तरी लोकांनीं दिलें आहे. पण त्या सर्वांचें नांव घेण्याची गरज नाहीं. कोणी पांचवा हिस्सा दिला आहे, कोणी सहावा हिस्सा दिला आहे. कोणी उत्पन्नाचा दिला आहे, कोणी खर्चाचा दिला आहे. हजारों एकर जमिनीच्या मालकांनीं हि दिला आहे आणि धनिकांपैकीं थोडयाशा लोकांनीं हि दिला आहे. परंतु मला ही जादू वाटते. हा महात्मा गांधींचा अथवा या देशांतील प्राचीन ऋषि-मुनींचा प्रताप आहे. या देशाच्या हवेंत च असें कांहीं आहे. परंतु आम्हांला तसें वाटत नाहीं. कारण श्रीमंतांच्या हृदयांत क्रांतीची एखादी आग पेट घेऊन राहिलेली नाहीं. "भूमीचें आणि संपत्तीचें वितरण होवो, समाजांत समता येवो, राष्ट्राची संपत्ति राष्ट्राच्या मालकीची होवो, संपत्तीचें राष्ट्रीयीकरण अथवा समाजीकरण होवो." हा कांहीं श्रीमंतांचा घोष नव्हे. हा तर तुमचा घोष आहे. 'इन्किलाब जिंदाबाद' 'क्रांति चिरायु होवो' हा घोष तुम्ही करतां. नव-समाजाचें स्वप्न तुम्ही पाहतां. जो उंच बसला आहे, तो काय म्हणून खाली उतरूं इच्छील ? तो कशाला उलटा-पालट इच्छील ? हें बरीक खरें.

तेव्हां भूमि आणि संपत्ति यांचें वितरण करणें हें क्रांति आणि समता इच्छिणारांचें कर्तव्य होय. या क्रांतींत त्यांचें पाऊल पुढें पाहिजे, हें त्यांचें काम आहे. भांडवलशाही समाजांत होणाऱ्या क्रांतीचें नेतृत्व कामकरी मजुरांच्या हातीं राहील, असें समाजवादी आणि साम्यवादी यांनीं म्हटलें आहे. आम्ही हि हें च म्हणतों कीं

या क्रांतींत प्रगति करायची तर ती तुम्हांला च करायची आहे. परंतु खऱ्या मार्गानें करायची आहे. जितक्या जुन्या क्रांत्या झाल्या त्यांत क्रांतिकारकांना यश मिळालें नाहीं. समाजांतील समस्यांचें निराकरण झालें नाहीं. समाजांतून संघर्ष, कलह आणि विषमता मिटलीं नाहींत. याचीं कारणें मीं तुम्हांला समजावून सांगितलीं आहेत. यासाठीं तुम्हांला क्रांतीचा दुसरा रस्ता धरला पाहिजे. परंतु आज तर गरीब म्हणतो कीं "कोटचधीशांचें धन समाजाचें आहे. म्हणून कोटचधीशांच्या धनाचें समाजीकरण वा वितरण झालें पाहिजे. परंतु आमचें धन तर आमचें आहे. त्याचे आम्ही मालक आहोंत. त्याच्या वितरणाचा कांहीं प्रश्न नाहीं. मला पन्नास रुपये मिळतात, याला दीडशें, आणि त्याला अडीचशें मिळतात. त्याचें वितरण नाहीं होणार. तें आमचें आहे आणि तें आम्ही घट्ट धरून ठेवणार. आम्हीं आपल्या बुद्धीच्या बळानें तें पैदा केलें आहे. पराक्रमानें पैदा केलें आहे. म्हणून तें आमचें आहे. आणि श्रीमंतांच्या संपत्तींत सर्वांचा हिस्सा आहे. कारण ती सर्वांच्या साहाय्यानें आणि सहकार्यानें पैदा झाली आहे." अशा प्रकारें तो दोन भूमिकांवर उभा राहतो. आपल्यासाठीं स्वार्थाची आणि श्रीमंतांसाठीं निःस्वार्थतेची.

जगांत दीडशें वर्षांपासून मजुरांचें ट्रेड यूनियन आंदोलन चालू आहे. त्याचा जन्म इंग्लंडमधें झाला. आणि तिथें च तें फोफावलें. ब्रिटिश ट्रेड यूनियन कांग्रेस जगांतील मोठ्यांतील मोठ्या आणि मजबूतांतील मजबूत संस्थांमधें मोडते. तिची स्वतःची पार्टी आहे, पक्ष आहे. तिनें आपलें राज्य हि चालवलें. तिथें मजुरांचें राज्य देखोल स्थापन झालें. पण इतकें सगळें होऊन देखील आज

इंग्लंडच्या मजुरांची स्थिति काय आहे ? त्याची धारणा काय आहे ? त्याचा काय विचार आहे ? त्याचें आणि समाजाचें जीवन कसें आहे ? दीडशें वर्षांच्या लढयांत तो आज कुठवर पोंचला आहे. अमेरिकेंत ट्रेड यूनियन आंदोलन खूप च जबरदस्त आहे. त्याचे एक-एक ॲग्रिमेंट, करार, होतात. संघटित मजूर मंडळी इतक्या कुशलतेनें आणि ताकतीनें आपल्या हितासाठीं तडजोड करते––तिची मजल इथपर्यंत जाते कीं मालक कोणा मजुराला जोंपर्यंत तो मजूर ट्रेड यूनियनचा मेंबर बनत नाहीं तोंपर्यंत नोकरीस ठेवूं शकत नाहीं. त्यांनीं "क्लोज शॉप, तालाबंद दुकान" अस्तित्वांत आणलें आहे. त्यांनीं हें सगळें केलें खरें. तथापि ते मजूरचे मजूर च राहिले, आणि मालक ते मालक च. दोहोंत लढा चालू आहे च. मग निष्पन्न काय झालें ? जिथें मजुरांच्या नांवानें क्रांति झाली आणि जिथें मजुरांचें राज्य आहे म्हणून म्हटलें जातें, तिथली स्थिति काय आहे, हें तुम्हां सर्वांना ठाऊक पाहिजे. तुम्ही जर जागरूक आणि दुनियेच्या घडामोडीशीं परिचित असाल तर तुम्हा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना कोणती हि गोष्ट नवी असतां कामा नये. सरतेशेंवटीं तिथें जें असें घडत आहे तें कां ? इतक्या वर्षांपासून तिथें हा लढा चालला आहे. त्याचा परिणाम कांहीं निघाला नाहीं; आणि कांहीं निघाला च असेल तर तो अगदीं च तुच्छ ! असें कां ? यांतून कांहीं निष्पन्न व्हायचें नाहीं; आणि झालें च तर तो च स्वार्थाचा झगडा, हें स्पष्ट आहे. फिरून आपसांतले तट आणि फिरून ती च मारामारी नि कापाकापी ! आज क्रांतीचा दुसरा मार्ग दाखविला जातो तो हा : "बाबा रे, तूं म्हणतोस कीं संपत्ति समाजाची आहे, तर तुझी हि संपत्ति समाजाची

आहे. भांडवल-दाराची संपत्ति समाजाच्या सहकार्यानें निर्माण झाली, तर तुमच्यांत अथवा दुनियेंत कोण असा आहे कीं जो म्हणूं शकतो कीं मीं आपल्या एकटयाच्या पुरुषार्थानें ही संपत्ति निर्माण केली आहे ? कोणी तरी मनुष्य असें म्हणू शकतो का ? मनुष्याचें एकाकी जीवन च नाहीं. तो एक सामाजिक जीव आहे. समाजांत राहतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत मनुष्याच्या बाबतींत सर्वांत मोठी गोष्ट समजून घ्यायची ती ही कीं समाजांत आपलें जीवन कसें अगदीं सहज आहे. सहज जन्म, सहज सारें काम, आणि मृत्यु हि समाजांत सहज च होतो. आपल्याला विचार करायला संधि च मिळत नाहीं. जन्मल्यापासून या जगाचा निरोप घेईपर्यंत समाज सतत आपल्याला कांहीं ना कांहीं देत च राहतो. मग आम्हीं कांहीं का करीत असोना. तुम्हांला इथें विद्या मिळते आहे. शिक्षण मिळतें आहे. हें शिक्षण घेऊन डिग्री मिळवून तुम्हीं इथून बाहेर पडलां आणि एखादा नोकरी-धंदा करूं लागलां, तर काय तुम्हीं म्हणाल कीं "आम्ही आमच्या बुद्धि-बलानें कमावून राहिलों आहों ? यांत कुणाचें काय आहे ? आम्ही आपल्या पराक्रमानें बी. ए., एम. ए. पास झालों." विचार करा, काय तुम्ही आपल्या एकाकी पराक्रमानें हें कधीं करूं शकलां असतां ? कोणा हि अतिशय तीव्र बुद्धीच्या विद्यार्थ्याला, जो फर्स्ट क्लास फर्स्ट येतो अशाला, तुम्हीं एकटें जंगलांत सोडून दिलें तर काय तो तिथून बी. ए., एम. ए. पास होऊन येईल ? तो कांहीं करूं शकत नाहीं. जंगली बनून येईल एवढें बरीक खरें. कदाचित् तो जिवंत हि राहणार नाहीं, मरून जाईल.

आपलें कोणतें च काम दुसऱ्याच्या मदतीशिवाय होऊं शकत नाहीं. मग तुम्ही नोकरी करा, शेती करा, मजुरी करा; व्यापार, वकिली वा डॉक्टरी करा.

कोणी मोठ्ठा वकील म्हणेल कीं "वा, मी बुद्धि-बळानें तर कमवीत आहें! यांत समाजाचा कसला आधार आहे?" परंतु विचार करा, वकीलसाहेबांस जर जंगलामधें सोडून दिलें असतें, तर काय ते वकिली शिकून आले असते? ही सर्व वकिलीची विद्या समाजानें निर्माण केली आहे. शेंकडों, हजारों वर्षांत हें सारें ज्ञान-विज्ञान निर्माण झालें. पटन्याच्या या विश्व-विद्यालयांत च बघा! इमारती बनल्या; किती लोकांनीं वर्गणी दिली! किती लोकांनीं कर दिला! किती अध्यापक इथें जमले आहेत! कितीकांनीं पुस्तकें लिहिलीं आणि छापलीं. सर्व काम होत आहे. समाजाचें कायदे बनले आहेत, तरी सुद्धां आपसांत झगडे होत च आहेत. पक्षकार वकील साहेबांकडे येतात, तेव्हां च त्यांना कमाई करतां येते. घरबसल्या कोण काय कमवणार? किती हि श्रीमंत का असेना, कोणी एकाकी कमाई करूं शकत नाहीं.

कोटयधीश म्हणतात कीं 'आम्ही आपल्या बुद्धीनें कमावीत आहोंत, यांत कुणाचा हिस्सा आहे?' परंतु समजा, देशांतील सर्वांत मोठ्या शेटजीस सांगितलें कीं हे कोटि रुपये घ्या आणि पन्नास वर्षें जंगलांत जाऊन बसा. अट केवळ एवढी च कीं कोणा हि माणसाशीं तुमची भेट होणार नाहीं. प्राणी, झाडें आणि चिमण्या यांच्याशीं जेंवढें प्रेम करायचें असेल तेवढें करा, परंतु मनुष्याशीं तुमची भेट होणार नाहीं. याप्रमाणें

जर तो एक कोट रुपये घेऊन पन्नास वर्षें जंगलांत जाऊन बसला, तर एक कवडी सुद्धां उत्पन्न करूं शकणार नाहीं. त्याच्या संपत्तींत एका पैशाची हि वाढ होऊं शकत नाहीं. कोण्या हि तऱ्हेनें जर तो आपलें पोट भरून जिवंत राहिला, इकडून तिकडून जंगलांतील लांकडें गोळा करून आणलीं, चांगले चांगले सुंदर दगड, रत्नें जमा करून आणलीं, कंद-मूल-फळें आणलीं, तरी जेव्हां तो तीं वाळलेलीं लाकडें आपल्या खांद्यावर गांवांत घेऊन जाईल आणि विकेल, तेव्हां च दोन पैसे त्याला मिळतील. गांववाल्यांपासून च त्याच्या संपत्तीची वृद्धि होईल. सारांश, जोंपर्यंत आमचा दुसऱ्याशीं संबंध येत नाहीं, तोंपर्यंत संपत्ति निर्माण होऊं शकत नाहीं, आम्ही विद्या मिळवूं शकत नाहीं, काम-धंदा, नोकरी कांहीं हि करूं शकत नाहीं. करोडपतींच्या जवळ जी संपत्ति आहे ती मजुरांनीं उत्पन्न केलेली आहे, म्हणून ती मजुरांना म्हणजे समाजाला मिळाली पाहिजे; त्या च प्रमाणें मजुरांजवळ जी संपत्ति आहे ती सर्व त्यांनीं च उत्पन्न केलेली आहे, त्यांत समाजाचा कांहीं हि हिस्सा नाहीं, हें म्हणणें हि सोळा आणे मिथ्या आहे.

इथें अर्थशास्त्राचे पंडित बसले असतील, अर्थशास्त्राचे विद्यार्थी बसले असतील. त्यांना माहीत च आहे कीं आजपर्यंत कोणतें हि असें शास्त्र अथवा विज्ञान तयार झालेलें नाहीं कीं जें हें दाखवून देईल कीं एका व्यक्तीनें समाजांत राहून जें उत्पन्न केलें त्यांत किती त्यानें उत्पन्न केलें, आणि किती दुसऱ्या लोकांच्या मदतीनें उत्पन्न झालें; व्यक्तीचा हिस्सा किती आणि इतरांचा किती, हें कोणी सांगूं शकत नाहीं. यांवर मोठमोठे सिद्धांत बांधण्यांत आले आहेत. एकांत हि सोळा आणे सत्य नाहीं. हा हिशेब लागूं च

शकत नाहीं. परंतु महात्मा गांधींनीं म्हटलें कीं हा ठोक आणि सरळ सोपा हिशोब आहे कीं जें कांहीं आम्हीं निर्माण केलें, तें सर्व समाजाच्या सहकार्यानें केलें आहे म्हणून तें सर्व समाजाचें आहे, आमचें नाहीं. मालकीच्या स्वामित्वाचा हा विचार च खोटा आहे. सर्व झगडयांच्या मुळाशीं हा च विचार आहे. मालकांची मालकी च नव्हे, तर मजुरांची मालकी सुद्धां मिथ्या आहे. दोन बीघेवाला लहान शेतकरी सुद्धां म्हणतो कीं 'ही जमीन माझी आहे' आणि दोन हजार बीघेवाला देखील म्हणतों कीं 'ही जमीन माझी आहे, मी हिचा मालक आहें' मालकीची भावना दोन बीघेवाल्या शेतकऱ्यांत सुद्धां उत्पन्न झाली आहे. तो देखील म्हणतो कीं लाठी घेऊन मी तयार आहें. कोणी जर माझ्या जमिनीवर पाय ठेवील तर मी फौजदारी करून डोकें फोडून टाकीन. मालकीची ही भावना च याच्या मुळाशीं आहे. आम्ही त्यांचें स्वामित्व पुसून टाकूं इच्छितों, त्यांच्या संपत्तीचें समाजीकरण करूं इच्छितों. आमची संपत्ति आमची आहे, अशी हांकाटी करीत राहिल्यामुळें च आमच्या या लढयांतून कांहीं निष्पन्न होऊन राहिलेलें नाहीं. परंतु दुसऱ्यानें आपली संपत्ति वांटून द्यावी असें मात्र आम्ही इच्छितों. त्यासाठीं प्रथम आम्हांला आपली संपत्ति वांटून दिली पाहिजे. जर आपण आपली संपत्ति वांटून द्यायला तयार न राहिलों आणि दुसऱ्याची संपत्ति वाटायला निघालों, तर समाजांत सर्वोदय, शांति अथवा समता येणार नाहीं. तुम्ही इथून शिकून बाहेर पडलां आणि म्हणूं लागलां कीं आम्ही हि डिग्री मिळवली आहे म्हणून सामान्य मजुराहून इतके पट वेतन आम्हांला मिळायला पाहिजे, तर सर्वोदय नाहीं होणार. तुम्हांला अधिक

आणि त्याला कमी मिळेल, तर सर्वोदय कुठें झाला ? सर्वांचें भलें कुठें झालें ?

महात्मा गांधींनीं म्हटलें आहे कीं जेव्हां सर्व लोक आपल्यापाशीं जें कांहीं आहे तें आपलें नव्हे असें समजतील, तेव्हां सर्वोदय होईल. वाडवडिलांची कमाई आमची नव्हे, आणि आमची स्वतःची कमाई हि आमची नव्हे. सारी कमाई समाजाची आहे. आणि आमचा धर्म हा आहे कीं आमच्यापाशीं जें कांहीं आहे, तें आम्हीं समाजाला अर्पण करावें आणि त्यांतून जेवढा अंश समाज आम्हांला देईल तेवढा च आम्हीं घ्यावा. सर्वांच्या गरजेचा हिशेब करून समाज जेवढें आम्हांला देईल तेवढ्यावर च आम्हीं निर्वाह करावा. तेव्हां च सर्वोदय होईल. जेव्हां आम्ही आपला स्वार्थ, स्वामित्व आणि मालकीचा विचार सोडून देऊं तेव्हां च सर्वोदय घडून येईल. म्हणून आम्ही हें च इच्छितों कीं समाजांतील शोषित, दलित, गरीब, दुःखी आणि क्रांति इच्छिणारे यांनीं आगेकूच करावें. त्यांनीं प्रथम आपल्या जीवनांत क्रांति करावी म्हणजे श्रीमंतांमधें आपोआप परिवर्तन घडून येईल. त्यांना देखील स्वामित्व विसर्जित करावें लागेल, आपला स्वार्थ सोडावा लागेल.

ही संपत्ति माझी आहे, मी हिचा मालक आहे, असें करोडपती आज म्हणतो. तें एवढ्या च साठीं कीं सगळा समाज असें च म्हणतो. करोडो गरिबांच्या तोंडून देखील हा च आवाज निघत आहे. म्हणून च त्याला असें म्हणण्याची हिंमत होते. परंतु जर करोडों मुखांतून असा आवाज निघूं लागला कीं "नाहीं, आमचें कांहीं नाहीं. ही भूमि, ही संपत्ति सर्व समाजाची आहे. आम्ही वांटून खात आहों, आम्ही हिचे मालक नाहीं,

सगळा समाज मालक आहे," तर या मूठभर लोकांना देखील असें म्हणण्याची हिंमत होणार नाहीं. परंतु आज समाजांत ही च मालकीची हवा आहे. समाजांत रूढ हें च मूल्य आणि हे च विचार आहेत. हा च आमच्या जीवनाचा नियम आहे. म्हणून च तो असें म्हणूं शकतो. या अर्थानें आमच्यांत आणि त्याच्यांत फरक काय? गरीब आणि अमीर यांत फरक काय? आम्ही देखील स्वार्थी आहों. आमच्यांत देखील तो च भाव आहे, 'आम्हीं जें उत्पन्न केलें, मग तें पन्नास च रुपये कां असेना, तें आमचें आहे.'

मग तो देखील म्हणतो—"तूं पन्नास मिळवले, तर मी पन्नास लाख! हा नशिबाचा खेळ आहे कीं तुला कमी मिळाले आणि मला जास्त. तुला देखील स्वत:साठीं पाहिजे आहे आणि मला देखील स्वत:साठीं पाहिजे आहे. तूं लढाईंत हरलास आणि मी जिंकलों. तूं हरलास म्हणून च माझ्यापासून हिरावून घ्यायला येत आहेस. आधीं तूं आपले देऊन टाक मग माझ्याजवळ माग."

सारांश, जेव्हां आम्ही आणि आमचे करोडों लोक आप-आपला स्वार्थ आणि स्वामित्व सोडून देतील तेव्हां च भरीव आणि खरी-खुरी क्रांति होईल. आणि तेव्हां च कदाचित् हे अमीर लोक जे आज सहा कोटींपैकीं फक्त एक कोट रुपये देत आहेत, ते सहाचे सहा कोट रुपये देतील. त्यांना म्हणावें लागेल कीं "हा कारखाना, दुकान अथवा कंपनी आमची नव्हे, सगळ्या समाजाची आहे आणि नफा देखील आमचा नाहीं. आम्ही समाजाची सेवा करूं आणि जो नफा होईल तो समाजाचा होईल. समाज आम्हांला जें देईल तेवढ्यांत आम्ही आपला निर्वाह करूं."

परंतु चर्चेसाठीं धरून चला कीं कांहीं लोक असे निघतील कीं ज्यांचा मोह चांगला खोल आहे आणि म्हणून ते या गोष्टीला तयार होणार नाहींत. तेव्हां काय होईल ? जेव्हां आपल्या स्वार्थाचा परित्याग करणारे करोडों लोक "धनपतींचें धन समाजाला मिळालें पाहिजे, त्यांत सर्वांचा वांटा असला पाहिजे, जेवढा वांटा आमचा असेल तेवढा च आम्हांला मिळाला पाहिजे, आम्ही स्वत:साठीं नव्हे तर समाजासाठीं मागत आहों, आम्ही आपल्या जवळचें देखील इतरांना वांटून देत आहों, सगळे मिळून उत्पादन करतों आहों आणि आपसांत वांटून खातों आहों," अशा नैतिक भूमिकेवर आरूढ होतील तेव्हां हि जर धनपति आपली भूमिका सोडणार नाहीं तर गरीब त्यांना म्हणूं शकेल : "ठीक आहे साहेब, तुम्हांला हि इतकें पाप केल्याशिवाय राहवत च नाहीं, अधर्माची वाट सोडवत च नाहीं, तर मग आम्ही हि तुमच्याशीं कुठलें च सहकार्य करणार नाहीं. आम्ही तुमच्या शेतांत औत धरणार नाहीं, कारखान्यांत व ऑफिसांत काम करणार नाहीं." तेव्हां मग तुम्ही काय समजतां हा समाजाचा डोलारा तसा च कायम राहील ? हा सगळा समाज एखाद्या पिरामिडसारखा आहे. पिरामिडच्या टोकावर हे लोक बसले आहेत. पण त्याचा आधार काय आहे ? त्याच्याखालीं पडलेले, हे करोडों लोक, त्याचा आधार आहेत. करोडोंचा स्वार्थ, करोडोंचें स्वामित्व या मूठभर लोकांच्या स्वार्थाचा आणि स्वामित्वाचा आधार आहे. जेव्हां करोडों लोक आपला स्वार्थ आणि स्वामित्व सोडून देतील तेव्हां हा सगळा जो पिरामिड आहे तो आपोआप खाली बसेल.

आज मजूर म्हणतो "तुम्हीं इतका नफा कमावला आहे म्हणून तुम्हांला आमची मजुरी रुपयास दोन आणे प्रमाणें

वाढवावी लागेल. वर्षांतें तीन महिन्यांचें बोनस मिळतें, तर एक महिन्याचें बोनस तुम्हांला आणखी द्यावें लागेल. म्हणजे तुमच्या नफ्यांत आम्हांला अधिकाधिक वांटा मिळाला पाहिजे." परंतु त्याचें अंतिम उद्दिष्ट हें च कीं आम्हीं आपआपली सगळी संपत्ति च विसर्जन करायची. हें जें आमचें घर उभें आहे, तें सर्वांचें आहे. घर जर खूप मोठें असेल, त्यांत पुष्कळ जागा असेल आणि आम्ही थोडेसे लोक राहत असूं, तर सगळे घर व्यापून आम्हीं कां रहावें ? इतरांना लहान-लहान खोल्या आहेत, त्यांत च त्यांचें सर्व कुटुंब राहतें. तिथें च स्वयंपाक होतो, तिथें च बाई बाळंत होते आणि तिथें च आजारी हि पडलेला असतो. सगळें कांहीं तिथें च होतें. असें कां ? तेव्हां आपल्या घराच्या एका भागांत आपण इतरांना हि जागा देऊं.

त्या वेळचें सारें चित्र कसें असेल, तें आम्ही आज सांगूं शकत नाहीं. 'कम्युनिटी लाईफ,' किंवा शिबिरासारखें जीवन, होऊन जाईल का ? तें आज सांगतां येत नाहीं. इतकें खरें कीं त्याचें अस्पष्ट असें चित्र आमच्यासमोर जरूर आहे. परंतु समग्र रूप-रेखा स्पष्ट नाहीं. आणि ग्राम-राज्याचें तरी पूर्ण चित्र आमच्यासमोर पूर्वीं कुठें होतें ? गेल्या चार-पांच वर्षांत हें चित्र उजळत गेलें आहे.

आज कोणा कारखानदारानें समजा सांगून टाकलें कीं आम्हीं संपत्तीचें विसर्जन केलें आहे. आतां हा कारखाना आमचा उरला नाहीं. तेव्हां विचार करावा लागेल कीं तो कसा चालवावा. आज जिथें राष्ट्रीयीकरण होतें, म्हणजे जिथें कारखाने वगैरे राष्ट्राच्या मालकीचे केले जातात, तिथें ते कसे चालतात ? आमच्यासमोर सिंदरीचा कारखाना आहे, चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्कस् आहे;

हा कारखाना कसा चालतो, आहे ठाऊक तुम्हांला ? जनरल मॅनेजरला तीन हजार, साडे तीन हजार रुपये मिळतात आणि सामान्य मजुराला मिळतात साठ, सत्तर अैंशी रुपये, असें आहे चित्र. जिथें संपत्तीचें विसर्जन करण्यांत येईल, तिथें हि काय असें च राहील ? मुळीं च नाहीं. खात्रीनें त्यांतून कांहीं वेगळें च चित्र निघेल. परंतु ह्या पुढच्या गोष्टी आहेत. जसा जसा आपला विचार प्रगत होत जाईल, आपलें मन शुद्ध होत जाईल, आज डोळ्यांवर आलेला पडदा जसजसा दूर सरेल, तसतसें पुढचें स्पष्ट दर्शन होत जाईल. आज जी स्थिति आहे, ती च जशीची तशी कायम रहावी. 'स्टेटस् को' कायम रहावा, असें तुमच्यापैकीं कोणी च इच्छिणार नाहीं, त्या च प्रमाणें कांहीं थोड्या च लोकांचें भलें व्हावें, असें हि कोणी इच्छिणार नाहीं. सर्वांचें भलें व्हावें, देशांत एक हि उघडा नागडा, दु:खी अथवा गरीब राहतां कामा नये, अशी च तुमची इच्छा असणार अशा स्थितींत तुमचा मार्ग, विनोबांचा च मार्ग होऊं शकतो.

स्वराज्याच्या लढ्याचा काळ होता, त्या वेळचा माझा स्वत:चा अनुभव हि हा च आहे. या च पटना कॉलेजांत मी हि शिकत होतों. इंटर सायन्सचा मी विद्यार्थी होतों. शहरांत जेव्हां गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीची, नॉन-को-ऑपरेशनची, लाट आली, तेव्हां या च ठिकाणीं खूप मोठी सभा झाली होती. तो दिवस मी कधीं विसरणें शक्य नाहीं. त्या दिवसापासून माझें सर्व जीवन च पालटलें, बदलून गेलें. मौलाना अबुल कलाम आजाद यांचें भाषण ऐकलें, पंडित जवाहरलाल नेहरू हि उपस्थित होते. त्यावेळीं त्यांचें आजच्यासारखें नांव नव्हतें, आणि मौलाना साहेबांच्या वाणींत जी ताकद होती, ती ताकद हि त्यांच्या वाणींत नव्हती. आग लावून

देणारे शब्द होते त्यांचे. गंगेनें पेट घ्यावा तशी स्थिति झाली होती. या च पटना कॉलेजामधून, सायन्स कॉलेजमधून, बी. एन. कॉलेज-मधून शेंकडों विद्यार्थी बाहेर पडले. आमच्या इंटर सायन्सच्या परीक्षेला वीस दिवस उरले होते. परंतु प्रिन्सिपल साहेबांना आम्हीं लिहून टाकलें होतें कीं या साऱ्या शिक्षण-संस्था, सैतानाच्या संस्था आहेत, हें आम्ही ओळखून चुकलों आहों. गांधीजींनीं अगदीं कठोर शब्दांचा प्रयोग केला होता—'सटॅनिक'. मौलाना साहेबांनीं हें च समजावून सांगितलें होतें कीं, "बाबांनों, विषाची गोळी चोखून राहिला आहां. जें तुम्हांला या कॉलेजांत शिकविण्यांत येत आहे तें जहर आहे. जोपर्यंत कोणी आम्हांला दुधाचा प्याला आणून देत नाहीं, तोंपर्यंत विषाची गोळी चोखणें आम्ही बंद करणार नाहीं, असें का तुम्ही म्हणणार ? हा तर मूर्खपणा होईल. समजा, राष्ट्रीय विद्यालय नाहीं. परंतु कमींत कमी ही जी विद्या तुम्हांला इथें शिकविली जाते, ती तर शिकतां कामा नये."

बस, असहकार सुरू झाला, संबंध देशभर हजारों विद्यार्थ्यांनीं आपआपलीं कॉलेजें सोडलीं आणि नवीन रस्ता धरला. तें हिंदुस्थानच्या खेड्यांत गेले आणि त्यांनीं तिथें हातपाय हाल-वायला सुरूवात केली. आमच्यापैकीं पुष्कळसे विद्यार्थी शेंवट पर्यंत त्या च रणांगणांत राहिले आणि आज हि आहेत. तो एक जमाना होता, जे स्वाभिमानी नवजवान देशाभिमानी विद्यार्थी होते, ज्यांच्या हृदयांत देश-प्रेमाची कांहीं भावना होती त्यांनीं मनांत पूर्णपणें ओळखून घेतलें होतें कीं इंग्रजांची नोकरी करणें आपलें काम नव्हे. मग मोठ्यांतील मोठा पगार कां मिळेना, डेप्युटी मॅजेस्ट्रेटचें पद का मिळेना. श्री. मैथिलीशरण यांच्या शब्दांत, त्या

वेळचे लोक मानत "स्वर्गका सोपान है यह, हाय रे डिप्टीगिरी।" डेप्युटी मॅजेस्ट्रेटी सुद्धां फार मोठी वाटत होती. त्याकाळीं त्या सर्वांवर त्यांनीं लाथ मारली आणि महात्मा गांधींच्या आवाहनासरशीं शेंकडों, हजारों नवजवान बाहेर पडले.

परंतु आज ती गोष्ट राहिली नाहीं. आतां तर स्वराज्य झालें आहे. विद्यार्थी धरून चालले आहेत कीं आतां काम संपलें आहे. आपलें पोट भरावें, खावें, कमवावें या शिवाय दुसरें काम, आतां काय आहे ? इंग्रजांचें राज्य होतें तेव्हां सरकारी नोकरी करणें देशद्रोह मानला जाई. पण आज तर आपलें राज्य आहे, स्वराज्य आहे. अशा स्थितींत सरकारी नोकरी, मग ती पोलीस ठाणेदाराची का असेना, देश-सेवा आहे, आज नवजवान असें मानतों. आपलें राज्य आहे, तेव्हां सरकारी नोकरी करण्याला आपण देश द्रोह कसें म्हणूं शकतों ? परंतु आज देशाचें सर्वांत मोठें काम अथवा सर्वांत मोठी सेवा, म्हणजे सरकारी नोकरी करणें नव्हे, वकिली करणें अथवा डॉक्टरी करणें नव्हे, हें खास. आपल्याला निःस्वार्थपणें सेवा करायची आहे. पोट बांधावें लागलें तर पोट बांधून सेवा करायची आहे. प्रत्यक्ष सेवा करायची आहे. दुर्भाग्याची गोष्ट आहे कीं तुम्हां सर्वांचें ध्यान, वरिष्ठ नोकऱ्या, सत्ता आणि राजकारण यांच्याकडे लागलें आहे. कारण जें काय व्हायचें तें राजकारणाच्या वा सत्तेच्या द्वारां च होऊं शकतें, असें आपण मानतों आहों.

अशा तऱ्हेचें आमचें मूल्य होऊन गेलें हें खरोखर आमचें मोठें दुर्भाग्य होय. यांत आमच्या पुढाऱ्यांचा हि हात आहे. देशाचें

हें दुर्भाग्य म्हटलें पाहिजे कीं स्वराज्याच्या लढ्यांत जितके पहिल्या रांगेतील पुढारी होते, ते सारे सत्तेच्या पदावर निघून गेले, आणि त्यांनीं समाजांत हा विचार पसरून दिला कीं सर्वांत मोठें काम हें च आहे, सर्वांत उच्च स्थान हें च आहे, सर्वांत मोठी सेवा ही च आहे. एकटें महात्मा गांधी याला अपवाद होते. जगांतील इतर देशांत जेव्हां जेव्हां क्रांति झाली, तेव्हां तेव्हां क्रांतीच्या सेनापतींनीं आपल्या हातांत राज्यसूत्र घेतलें. अमेरिकेंत जॉर्ज वॉशिंगटन आपल्या देशाचा पहिला राष्ट्रपति झाला. रशियांत लेनिन आपल्या देशाचा पहिला पंतप्रधान झाला. या च प्रमाणें सर्वत्र झालें. परंतु ज्याच्या प्रतापानें आणि विलक्षण नेतृत्वानें आपल्याला स्वराज्य मिळालें, तो आमचा नेता और होता. कदाचित् स्वराज्याची पात्रता जितकी असायला पाहिजे तितकी आमच्यांत आली नव्हती. परंतु या नेत्याचा हा औरपणा, ही विलक्षणता म्हटली पाहिजे कीं इतक्या लवकर स्वराज्य मिळालें. परंतु त्यानें आपल्या हातीं सत्ता नाहीं घेतली. गांधीजी या देशाचे ना राष्ट्रपति झाले, ना प्रधान मंत्री. त्यांना मिळूं शकत नव्हतें असें अेक हि पद नव्हतें. सरतेशेंवटीं पंडित जवाहरलाल नेहरू काय आणि कोणी च काय, सर्वांना घडवणारे ते च तर होते सर्वांनीं त्यांच्या पायांपाशीं बसून राजकारणाचे धडे घेतलें होते. सर्वांचे ते बापू होते. मग त्यांनीं कां नाहीं सत्ता ग्रहण केली ? एवढ्या च साठीं कीं ते या देशाला समजावून सांगूं इच्छीत होते कीं बाबा रे, देशाची जीं खरीं कामें आहेत ती सत्तेनें नाहीं होऊं शकत, कायद्यानें नाहीं होऊं शकत.

आज तुम्ही मध्यम वर्गाच्या कुठल्या हि एखाद्या मंडळींत जरा जाऊन बसा, बस ही चर्चा सुरू होईल—" मोठा लाचखाऊ-

पणा आहे, मोठा भ्रष्टाचार आहे. आपलें मोठें नैतिक पतन होऊन राहिलें आहे. देशाची नीतिमत्ता घसरत आहे." शेंवटीं समाज कसा उठेल ? कशा प्रकारें आमचें चारित्र्य बनेल ? आपले विचार कसे बदलतील ? आमचीं मूल्यें कशीं बदलतील ? जीवनाचे आमचे आदर्श कसे बदलतील ? काय दंडुक्याच्या जोरानें बदलतील ? अथवा कायद्यानें संभवेल ? कायद्यानें सांगितलें कीं सत्य बोला, तर आम्ही सत्यवादी हरिश्चंद्र नाहीं होऊन जाणार, कायद्यानें सांगितलें त्याग करा, तर आम्ही त्यागी नाहीं होऊन जाणार, वस्तुतः हें कायद्यानें होणारें नाहीं आणि दंडुक्याच्या जोरानें हि होणारें नाहीं. जे हिंसाप्रेमी आहेत आणि जे हिंसेवांचून क्रांति होणार नाहीं असें मानतात, ते मूल्य-परिवर्तन-रूप क्रांति नाहीं करूं शकत. हें काम कायद्यानें होऊं च शकत नाहीं. हें काम जर राज्याकरवीं होऊं शकतें तर समाजाचें काम फार सोपें होऊन गेलें असतें. मग तर कायदा होत जाता आणि आपण वर वर चढत जातों, आणि स्वर्गात पोंचतों अथवा स्वर्गाला च या पृथ्वीवर घेऊन येतों. परंतु असें होत नाहीं. याच्या अगदीं उलट, कायदा सांगतो एक, तर आम्हीं करतों भलतें. कायदा रस्त्यानें येतो, तर आम्हीं बोळांतून फिरतों. आपण कायद्यापासून लपतों, दूर राहतों आणि तो मोडतों. हा नेहमींचा अनुभव आहे.

एवढ्या च साठीं महात्मा गांधींनीं आपल्या हातीं सत्ता घेतली नाहीं. ते म्हणाले कीं आपल्याला तर लोकांना तयार करायचें आहे; माणूस तयार करायचा आहे कायदा नव्हे. कायदा बनविणाऱ्यांनीं कायदे बनवावे, आमचे जें काम आहें तें आम्ही करूं.

माणूस बनविण्याचें काम कायद्यानें होणार नाहीं, प्रेमानें होईल, विचारानें होईल. आम्ही लोकांना प्रेमानें समजावून सांगूं. माणूस हा एक विचारवंत प्राणी आहे. देवानें माणसास जी सर्वांत मोठी गोष्ट दिली आहे, ती आहे विचार-शक्ति. विचार-शक्तीनें च आज विनोबा काम घेत आहेत. त्यांच्याजवळ दुसरी कोणती हि शक्ति नाहीं. विचार-शक्तीच्या जोरावर च ते पायीं फिरून विचारांचा प्रसार प्रेमानें करीत आहेत.

आज तुमचें लक्ष उंच-उंच जागांवर लागलें असेल आणि त्याला तुम्ही महत्त्वाकांक्षा मानीत असाल. पण माझें नम्र मत आहे कीं ती कोणत्या हि अर्थीं महत्त्वाकांक्षा नाहीं. मी नाहीं म्हणणार कीं ज्या जागेवर पंडित जवाहरलाल नेहरू बसले आहेत, तिथें हि जायची इच्छा करणें म्हणजे फार मोठी महत्त्वाकांक्षा झाली. मी नाहीं मानत कीं आज पंडित जवाहरलाल नेहरू प्रधान-मंत्रिपद सोडून खेडोपाडीं प्रेमाचा संदेश घेऊन फिरले, तर उंच जागेवरून खालच्या जागेवर आले ! परंतु मी तर म्हणेन कीं या प्रकारें ते उंच जागेवरून अधिक उंच जागेवर पोंचले. परंतु आज आमचें मूल्य असें कांहीं उलट-पालट झालें आहे कीं लोक मानतात कीं जयप्रकाश नारायणनीं राजकारण सोडलें तर देशाचा फार मोठा अपकार झाला, आतां कसें होणार ? आतां विरोधी दल कसें बनणार ? इत्यादि गोष्टी लोक मनांत आणतात. अरे बाबा, राजकारणाची काय शक्ति आहे, तें कितीसें करूं शकतें ? जरी जवाहरलालजींनीं हि मोठा कायदा केला कीं "तमाम सर्वांनीं खरें बोलावें." तरी कोणी खरें नाहीं बोलणार. हें तर समजावून सांगून च होऊं शकतें.

म्हणून मी तुम्हांला या सेवा-क्षेत्रांत येण्यासाठीं आवाहन करूं इच्छितों. आज काय होतें ? जे प्राणवान्, शक्तिवान् विद्यार्थी असतात, ते जातात आय. ए. एस् मधें, एअर फोर्स मधें, आणि ज्यांच्यांत तेवढी शक्ति नसते, प्राण नसतो, बुद्धि नसते, त्यांना वाटतें आपल्याला कुठें कांहीं मिळत नाहीं तर चला भूदानांत करूं काम. आज असा उलटा प्रकार चालला आहे. तुम्हांला या गोष्टीचें हंसू आलें. परंतु ही गोष्ट रडायची आहे, हंसायची नाहीं. महात्मा गांधी प्रधानमंत्र्याच्या गादीवर बसले नाहींत. कारण समाजांत निःस्वार्थ सेवेची शक्ति ही सर्वांत मोठी शक्ति होय. शिकले-संवरलेले लोक अशी निःस्पृह सेवा नाहीं का करणार ? त्यांनीं म्हणायला पाहिजे कीं "आम्हांला आपल्यासाठीं कांहीं नको. कुठलें पद आम्ही मागत नाहीं. डिस्ट्रिक्ट बोर्डांत देखील कुठलें पद मागत नाहीं मग पार्लमेंटचे मेंबर अथवा मंत्री बनण्याची गोष्ट तर सोडून च द्या. आम्ही 'नःस्पृह सेवा-कार्य, विचार-प्रचाराचें कार्य आणि क्रांति-कार्य करूं. आम्हांला समाजाचें परिवर्तन करायचें आहे. नवा समाज बनवायचा आहे."

सर्वोदय-समाज दिल्लींत पंडित जवाहरलाल नेहरू कायद्यानें नाहीं बनवूं शकत. कारण सर्वोदय-समाज तोंपर्यंत बनू शकत नाहीं जों पर्यंत स्वार्थाचा परित्याग होत नाही. स्वार्थाचा परित्याग कायद्यानें नाहीं होऊं शकत. कायदा तर म्हणतों कीं इतका 'इन्कम टॅक्स' द्या. परंतु पट्ठे हजारो रुपये वकिलांना फी देऊन 'इन्कम टॅक्स' देण्यांतून कसें निसटावें तें शिकून घेतात. ते दोन वह्या ठेवतात. एक 'इन्कम टॅक्स' ऑफिसा-साठीं आणि दुसरी आपल्यासाठीं. कायदा तर सांगतो आहे कीं

स्वार्थ सोडा. जितकें तुम्ही कमावलें तितकें नका ठेवूं, कांहीं सोडून द्या. त्यांत समाजाचा हक्क आहे. कारण समाजाच्या मदतीनें ती कमाई झाली आहे. परंतु तो स्वेच्छेनें सोडत नाहीं. समजा कायद्यानें त्याच्याजवळून जबरदस्तीनें काढून हि घेतलें. तुमच्याजवळ लाख रुपये आहेत आणि कायद्यानें म्हटलें, 'बाबारे, हजाराहून अधिक रुपये तुला जवळ ठेवतां येत नाहींत बाकीचे सारे देऊन टाक.' आणि अशा प्रकारें ते कायद्यानें सरकार-जमा केलें; तुमच्याजवळ हजार एकर जमीन आहे, कायद्यानें म्हटलें 'पन्नास एकराहून अधिक जमीन ठेवायची नाहीं.' आणि म्हणून सरकार जमा केली. तरी पण त्या जमिनीविषयीं अथवा त्या संपत्तीविषयीं आमच्या मनांत जो लोभ आहे, तो तर कायद्यानें जाणार नाहीं ना ? आम्ही तर छाती ठोकून सांगूं कीं या लोकांनीं आमची जमीन बळकावली, संपत्ति हिरावून घेतली, वाड-वडिलांची कमाई हिरावून घेतली; हे कसे दुष्ट लोक आहेत ! आमच्यांत प्रति-काराची भावना उद्भवेल, आम्ही त्यांचा सूड घेण्याचा विचार करूं. सारांश, कायदा आमचा लोभ कधीं नाहींसा करूं शकत नाहीं.

तेव्हां तुम्ही जर खरी क्रांति करूं इच्छित असाल तर प्रथम आपल्या जीवनांत क्रांति करा. आज तर प्रत्येक जण आणि पुष्कळसे विद्यार्थी देखील म्हणतील कीं जमिनीची वांटणी झाली पाहिजे, दहा-वीस एकरांशिवाय कुणाजवळ जास्त जमीन राहतां कामा नये. पण आपल्या घरची पांचशें एकर जमीन वांटायला कोणी तयार होत नाहीं. म्हणतात कीं 'जेव्हां कायदा होईल, सर्वांची जमीन वांटली जाईल तेव्हां आम्ही सुद्धां वांटूं.' शेंवटीं विनोबा म्हणतो आहे, गांधी म्हणतो आहे कीं यांत काय

झालें ? यांतून कांहीं च निघायचें नाहीं. आज कुणाला शक्ति वाटली आणि त्यानें हिसकावून घेतलें, तर उद्यां कुणा दुसऱ्याला शक्ति वाटेल आणि तो हिसकावून घेईल. मग हिसका-हिसकीची च परंपरा चालत राहणार का ? क्रांति दिल्यानें होईल, बळकावल्यानें नाहीं. ती विचारपूर्वक दिल्यानें होत असते, भीक किंवा दान समजून दिल्यानें नाहीं, केव्हां च नाहीं. विनोबा नाहीं म्हणत कीं आम्ही तुमच्यापाशीं भीक मागत आहों. ते तर हक्क मागत आहेत, विचार समजावीत आहेत. विचार समजून घेऊन देत असाल तर आम्ही घेतों, नाहीं तर तुमचा एक पैसा आम्हांला नको. तुमची एक तास जमीन हि आम्हांला नको, तुम्हांला च लखलाभ असो ती. सारांश, मुख्य वस्तु आहे विचाराचें परिवर्तन. तेव्हां विद्यार्थी बंधूनो, जोंवर स्वराज्याची लढाई होती, तोंवर त्यागाचा जमाना होता, तेव्हां सेवेचा जमाना होता, आतां काय स्वराज्य झाल्यावर चैनीचा जमाना आहे, कमाईचा आणि मौज मजा करण्याचा जमाना आहे, असें नका समजूं. छे छे मुळीं च नाहीं. आज या देशांत त्यागाची आणि तपस्येची जितकी आवश्य-कता आहे तितकी स्वराज्याच्या लढ्याच्या काळांत देखील नव्हती. आज देश तुमच्यापासून त्यागाची मागणी करीत आहे. आय. ए. एस्. व्हा अशी मागणी नाहीं करीत. जे प्राणवान् तरुण आहेत, ज्यांच्यात कांहीं धमक आहे, जे फर्स्ट क्लॉस फर्स्ट पास होतात, मी तर म्हणेन कीं त्यांचें हें कर्तव्य आहे कीं त्यांनीं म्हणावें, "आम्ही जाडें-भरडें नेसूं, कोंडा-कळणा खाऊं, पण सेवा करूं. आम्ही आय. ए. एस्. मधें नाहीं जाणार." ज्यांना सेवा क्षेत्रांत स्थान मिळणार नाहीं, त्यांनीं जावें आय. ए. एस्. मधें.

आम्ही आजच्या परंपरेला पार उलटवून देऊं इच्छितों. आपल्या देशांत पूर्वी काय होतें ? क्षत्रियांचें राज्य, राजांचें राज्य. परंतु ब्राह्मण ? तो निःस्पृहपणें सेवा आणि लोकसंग्रह करणारा, आपल्यासाठीं संग्रह न करणारा, ज्ञानार्जन करणारा आणि ज्ञान-दान करणारा असे. कोणा जाति-विशेषाला उद्देशून बोलत नाहीं मी. त्याची जात होऊन बसली आहे दुर्दैवानें. परंतु निःस्पृह आणि अपरिग्रही सेवक च समाजांत सर्वोच्च मानला गेला. गांधीजी या देशाचे प्रधान मंत्री नाहीं झाले. त्यांचें एखादें मकान नव्हतें. जें कांहीं होतें ते सर्व सोडून देऊन, ते लंगोटी लावून चालत. परंतु ते विश्ववंद्य झालें. त्यांची हत्या झाली तेव्हां ब्राझिल, आर्जेंटाईना, आणि अन्यत्र कुणास ठाऊक कुठें-कुठें, शोकसभा झाल्या. दुःखानें सारें जग कांपलें. मानवाची खुबी ही कीं तो सत्तेपुढें झुकतो खरा, परंतु भातीनें झुकतो. परंतु खरोखर श्रद्धापूर्वक त्याचें मस्तक कुठें लवत असेल, तर तें त्याग, सत्य आणि धर्म यांच्या च पुढें; आणि तें हि आदरानें, भयानें नव्हे.

म्हणून तुमच्या आजच्या जीवन-मूल्यांत जर परिवर्तन झालें, क्रांति झाली, तर च मी तुम्हांला क्रांतिकारी समजेन. नाहीं-तर तुम्ही खोटे क्रांतिकारी आहां. तुम्ही 'इन्किलाब-जिंदाबाद' चा घोष खुशाल करा, अथवा पटना शहरांतून तोडफोड करा. तुम्ही कांहीं क्रांतिकारी नाहीं. क्रांतीसाठीं तुम्हीं आपल्या जीवनाच्या आदर्शांमधें बदल केला पाहिजे. तुम्ही शोषण आणि विषमता यांचे विरोधी आहा. परंतु रात्रं दिवस तुमच्या डोक्यांत, आपल्याला चांगल्यांत चांगली नोकरी कशी मिळेल ही च गोष्ट घोळत असते. अशा प्रकारें तुम्हीं देखील शोषकांच्या गोटांत शिरूं इच्छितां-

दाखल होऊं इच्छितां. तुम्ही विषमतेचे विरोधी आहां, परंतु इच्छा ही कीं अशी नोकरी मिळून जावी कीं स्टार्ट च साडे तीनशें रुपयांपासून असावा. आणि इकडे विषमतेच्या विरुद्ध ओरड हि चालू च ! सारा मिथ्यावाद आहे. अणि ह्या मिथ्या-वादाचा च परिणाम म्हणजे हा मिथ्याचार !

आपण सगळे गांधी नाहीं होऊं शकत, यद्यपि गांधीजी म्हणत कीं 'कोणी हि गांधी होऊं शकतो.' आपण सामान्य मनुष्य आहों. गांधीजींचें म्हणणें हि खरें होतें. तथापि आमचा दुबळेपणा आहे. आपल्यापैकीं प्रत्येक जण गांधी नाहीं बनूं शकत. आणि प्रत्येक जण विनोबा हि नाहीं बनूं शकत. परंतु त्या दिशेनें जितकें पुढें जातां येईल तितकें जाणें हें आपलें कर्तव्य आहे. थोडया वेळापूर्वीं च मी ऐकत होतों, आमचे एक मित्र--विनोबांच्या आश्रमांत राहणारे साधक, सिंधचे राहणारे एक नवयुवक, इथें च कुठें बसले असतील ते--म्हणत होते, "विनोबांनीं बोधगयेंत सम-न्वय-आश्रम स्थापन केला आहे. त्याची पाया-भरणी झाली आहे राष्ट्रपति राजेंद्रबाबूंच्या हस्तें. तिथें आश्रमांत काय झोपडया च आहेत, परंतु दूर-दूरचे लोक येतात" ते सांगत होते कीं तिथें एक मेक्सिकन जोडपें आलें आणि त्यानें आश्रमांतील एकजणाला विचारलें, 'चंडीगडविषयीं तुमचें काय मत आहे ?' तो म्हणाला, 'मला काय विचारतां ? चंडीगड आहे पंजाबची राजधानी'. तें जोडपें म्हणालें--" भारत आणि भारतीय यांविषयीं, गांधी आणि नेहरू यांच्या देशाविषयीं मोठा आदर वाटे. किती मोठचा मोठचा गोष्टी ते सांगत असतात. परंतु ज्या देशांत इतकी गरीबी आहे, इतके उपाशी व उघडे नागडे लोक आहेत, तिथें राजधानीसाठीं आणि

मंत्री, ऑफिसर आणि त्यांचीं ऑफिसें यांच्यासाठीं असे प्रासाद बांधले जावे ? गरीबांच्या छातीवर बनले आहेत हे प्रासाद !"

आज आमचीं मूल्यें च विकृत झालीं आहेत. नवी दिल्लीला जातों तर मन खिन्न होतें. काय आहे ही भारताची राजधानी ! सारें सूट-बूट घालून मोठमोठ्या मोटारींतून दौडत आहेत ! आमच्या साऱ्या भगिनी बाहेर पडतात जार्जेटच्या खूप कीमती विदेशी साड्या नेसून आणि ओठ रंगवून, फॅशनमधें चूर ! काय स्थिति आहे ही बाबारे ! काय ही च गरीब देशाची राजधानी आहे ? आमचीं सारीं मूल्यें बदलून गेलीं. आवडीला कांग्रेसनें ठराव केला कीं समाजवादी नमूना हें आमचें उद्दिष्ट आहे. तेव्हां विनोबा म्हणाले, "कांग्रेससारख्या एका मोठ्या पक्षानें, ज्याच्या हातांत सत्ता आहे अशा पक्षानें, असा निश्चय केला या बद्दल मला फार आनंद होतो." परंतु माझ्या मनांत प्रश्न उठला तो हा कीं समाजवादी नमूना तुम्ही कसा बनविला ? तुम्ही आपल्या घरांत कसला समाजवादी नमूना बनविला ? तुम्ही मोठे मोठे महाल सोडून दिले कीं नाहीं ? कीं त्यांत च बसून या गरीब देशाचें शासन तुम्हीं करीत आहां ?

आमच्यापैकीं प्रत्येक जण अपराधी आहे, प्रत्येक जण या पापाचा वांटेकरी आहे. आम्ही मध्यम वर्गाचे लोक, आमच्यापैकीं दरेक जण कमी-अधिक दुसऱ्याचा हक्क हिरावून घेत आहे. देशांत इतकें दारिद्र्य आहे कीं आम्ही जें खात पीत आहों नेसत आहों, त्यांत देखील इतरांचा वांटा आहे. आमच्या भाकरीवर, ज्यांना एक दाणा हि मिळत नाहीं त्यांचा दांत आहे. परंतु आज आमची जर

अशी शक्ति नाहीं कीं गांधी-विनोबांप्रमाणें आम्ही त्याग करूं शकूं. तर जितका होईल तितका त्याग करावा. ही साधना आपल्याला करायची आहे. आपल्याला वर उंच-उंच माड्यांकडे पाहायचें नाहीं, तर झोपड्यांकडे पहायचें आहे. आपलें जीवन आपण जितकें कांहीं खालीं आणूं शकूं तितकें खालीं आणणें आज आपलें कर्तव्य आहे. ही देशाची सर्वांत मोठी सेवा होय. तुम्हां नवयुवक विद्यार्थी मंडळींपासून सर्वांत आधीं मी ही अपेक्षा करतों. आज मी लखनौ-दिल्लीच्या विद्यार्थ्यांना पाहतों--सुदैवानें बिहारमधें हा रोग कमी पसरला आहे—फॅशनमधें चूर आहेत ते. ते सुटा-बुटांत राहतात, भारी भारी किंमतीचा विलायती कपडा वापरतात. गरीब देश आणि तिथल्या नवजवानांची ही स्थिति! आणि त्यावर क्रांतीचा घोष त्यांच्या जिभेवर! हा कसा उलटा धंदा ? कशी आत्म-वंचना ? कशी फसवणूक ही ?

आज वेळ येऊन ठेपली आहे. विनोबांनीं क्रांतीचा बिगुल फुंकला आहे. क्रांतीचा बिगुल दिल्लीच्या लोक-सभेंत, पटन्याच्या विधान-सभेंत वा सेक्रेटरिएटमधें नाहीं वाजून राहिला. तिथें ऑफिस आणि रेडटेप आहे. त्या च रेडटेपमधें देशाचें भाग्य आणखी जखडलें जात आहे. दिवसेंदिवस रेडटेपीची बढती होत चालली आहे. वटवृक्षाप्रमाणें अफसरशाही वाढत चालली आहे. एक वृक्ष झाला त्यांतून एक पारंबी खालीं आली, पुन्हां तिचा वृक्ष बनला आणि या च प्रमाणें पुढें राक्षसाप्रमाणें चोंहों बाजूंस ही अफसरशाही वाढत चालली आहे. असें दिसतें कीं ही साऱ्या लोकशाहीला खाऊन टाकील, देशाला गिळून टाकील. तुम्ही देखील त्या च अफसरशाही ( नोकरशाही तर तिला म्हणणें

ठीक नाहीं, अफसरशाही च म्हटलें पाहिजे.) मशीनचे पुर्जे होऊं इच्छितां, ही क्रांति नव्हे. तुम्ही मॅजिस्ट्रेट आणि पुलीस अफसर बनून समाजांत क्रांति नाहीं आणूं शकत. इमानदारीनें जर काम केलें, तर देशाची थोडीशी सेवा तुम्ही करूं शकाल. या बाबत आमची नाकबूली नाहीं. परंतु त्यांत आज देखील इमानदार लोक तर आहेत च, त्यांना च विचारा. त्यांना असें अनुभवास येतें कीं आपण फार थोडें करूं शकतों. असें जाळें पसरलें आहे कीं त्यांतून ते निघूं च शकत नाहींत. त्यांचा अंतरात्मा दडपला जात आहे, तुडवला जात आहे. म्हणून क्रांतीचा बिगुल तिथें नाहीं, जनतेच्या घरांत, गांवांत आणि शहरांच्या बोळांतून त्या च प्रमाणें झोपडयांतून वाजत आहे.

तात्पर्य, विनोबानें हा बिगुल वाजवला आहे. त्यांचें म्हणणें आहे कीं "सन सत्तावनच्या अंतापर्यंत कमींत कमी देशांतील गांवागांवांत (आणि देशांत एकूण पांच लाख अठ्ठावन हजार गांवें आहेत) भूमि-वितरण होऊन जावें, क्रांतीचा पहिला चरण तरी पार पडावा." आज जर कोणी माझ्याशीं वाद घालूं लागला कीं 'हें व्हावें कसें? मागितल्यानें जमीन नाहीं मिळायची' तर मी म्हणेन 'ह्या सर्व वृथा गोष्टी आहेत. झोपलेल्याला जागें करतां येतें, जागत्याला कसें जागें करणार? जो समजून च घेऊं इच्छीत नाहीं, त्याला समजून सांगणार कसें? ज्याला समजत नाहीं त्याला समजून सांगतां येईल. पण हा तर समजून च घेऊं इच्छीत नाहीं!' अरे बाबा, पांच वर्षांचा अनुभव आहे. अनुभव स्पष्ट सांगतो आहे कीं जिथें काम झालें, जिथें खरे कार्यकर्ते गेले, जिथें हा संदेश पोंचला, तिथें जनता आज मागें राहिलेली नाहीं. तुम्ही आम्ही मागें राहिलों आहों, जनता आमच्या पुढें आहे. गांवोगांव

जमिनीचें वांटप होऊं शकतें, पण कार्यकर्ते पाहिजेत. कार्यकर्ते ज्या वर्गांतून मिळतात त्याचें लक्ष आज दुसरीकडे लागलें आहे. हें लक्ष वळविण्यासाठीं विनोबा बाहेर पडला आहे आणि गांवोगांव फिरतो आहे.

विनोबानें सर्वांत मोठी सेवा केली ती ही कीं सर्वांचें जिथें लक्ष सत्तेकडे लागलें होतें तिथें तें त्यानें सेवेकडे वळविलें. तुम्हांला देशाची नवनिर्मिति करायची आहे; नवा भारत बनवायचा आहे. घाम गाळायचा आहे. बलिदान नव्हे, जीवन-दान करायचें आहे. आज समाज तुमच्यापासून बलिदान वा प्राणांची आहुति नाहीं मागत. भगतसिंगानें प्राणांची आहुति दिली. प्राणांच्या आहुतीची मागणी त्यावेळीं होती. परंतु आज प्राणांच्या नव्हे, जीवनाच्या, बुद्धीच्या, श्रमसेवेच्या आहुतीची मागणी आहे. सगळें जीवन समाजाच्या सेवेंत लागेल, असा संकल्प करा. करतां येईल तितका तुम्ही त्याग करा. अधिक त्याग करतां, तर कमी त्याग करणाराकडे तुच्छतेनें नका पाहूं. अहंकार कराल, तर सारी तपस्या खोटी होईल. तिच्यांतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. ज्यांनीं फार मोठा त्याग केला आहे, असे हि लोक इथें आहेत. त्यांचा त्याग पुष्कळ आहे, यांत शंका च नाहीं. परंतु त्यांनीं जर अहंकार केला, तर त्यांचा सगळा त्याग निष्फळ होईल. ज्याला वर चढतां येईल, त्यानें प्रेमानें दुसऱ्याला हात द्यावा. त्याला उचलून घ्यावें. सर्वांनीं पुढें जायचें आहे. एक पाऊल टाकलें असेल, तर दुसरें उचला. आज मी गांवच्या गरीब दुःखी शेतकऱ्यापाशीं काय मागणार ? तुमच्यापाशीं मात्र जरूर मागूं शकतों. म्हणून च तुमच्याकडे मागायला आलों आहें.

पहिला हप्ता म्हणून तुमच्यापासून मला तीन मागण्या मागायच्या आहेत. हा पहिला हप्ता आहे. दुसऱ्या हप्त्यासाठीं मी फिरून येईन. तिसरा हप्ता मागायची गरज पडणार नाहीं, असा माझा विश्वास आहे. पहिला हप्ता म्हणून एक अगदीं लहानशी मागणी मी तुमच्यासमोर ठेवतों आहें. आतां दोनशें विद्यार्थ्यांनीं संपत्तिदान दिलें. पटना शहरांत हजारों विद्यार्थी असतील. सुमारें आठ हजार विद्यार्थी तर कॉलेजचे आहेत. या आठ हजारांतून आम्हांला दोनशें विद्यार्थी मिळाले. ह्याचें कारण हें नव्हे कीं हे दोनशें विद्यार्थी निःस्वार्थ आहेत आणि बाकीचे सारे स्वार्थी आहेत. कारण इतकें च कीं काम करणारे लोक कमी पडले, ते ह्या दोनशें पर्यंत च पोचूं शकले. जर ते हा संदेश आणि संपत्तिदानाचें फॉर्म घेऊन प्रत्येक होस्टेलमधें, प्रत्येक बोर्डिंगमधें, जाऊं शकले असते आणि सर्वांना समजावून सांगण्याची संधि मिळाली असती, तर मला वाटतें आज आठ हजार संपत्तिदानें मिळूं शकलीं असतीं. विद्यार्थी देणार नाहीं असें होणार नाहीं. तो इतका स्वार्थ कां करील ? तो म्हणेल, 'मी तर कमाई नाहीं करीत, मी कुठून देऊं संपत्तिदान ?' विद्यार्थी कमाई नाहीं करीत, पण खर्च तर करतो ना ? तो जो खर्च करतो, त्यांत हि समाजाचा वांटा आहे. तुमचे आईबाप, नातलग अथवा जे कोणी तुमचे पालक असतील ते तुम्हांला जें कांहीं खर्चायला देतात त्यांत हि समाजाचा हिस्सा आहे. म्हणून आमची पहिली मागणी ही कीं प्रत्येक विद्यार्थ्यानें संकल्प करावा कीं दरमहा जितके रुपये मी खर्च करतों तितके पैसे मी देईन. रुपयास पैसा. पन्नास रुपये खर्च करीत असेन, तर पन्नास पैसे देईन. अगदीं लहानशी गोष्ट आहे. तुम्हीं नुसतें आठवड्याचें सिनेमा पाहणें सोडून दिलें, तर त्यांतून च काम भागेल. तुम्ही आपल्या

आई-वडिलांना नाहीं लिहायचें कीं 'मला संपत्तिदान करायचें असतें तेव्हां तेवढे पैसे ज्यादा मनिआर्डर पाठवीत जा'. तसें नाहीं. तें तर त्यांचें संपत्तिदान झालें, तुमचें नव्हे. तुम्हीं आपलें पोट मारून द्या. कांहीं-ना-कांहीं त्याग करा. चहाचा एक कप च कमी करा, अथवा दुसरें कांहीं कमी करा. दुधाचा एक पेला च कमी घ्या. गरीब विद्यार्थी म्हणतील, 'आम्हांला तर दूध पहायला हि नाहीं मिळत, आणि सिनेमा हि आम्ही पाहत नाहीं.' त्यांना मी म्हणेन, 'ठीक आहे. तुम्ही सिनेमाला नाहीं जात तर कांहीं वाईट नाहीं, चांगलें च आहे. पण तुम्हांला दूध प्यायला मिळत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे खरी. विद्यार्थ्यांना दूध तर मिळालें च पाहिजे, बुद्धि-जीवींना तर दूध अवश्य मिळालें पाहिजे. पण मिळत नाहीं. अस्तु. तुम्ही गरीब आहां, शंका नाहीं. तरी वीस-पंचवीस वा तीस रुपये महिना, जो काय खर्च करीत असाल तुम्ही, त्यांतून च एक पैसा काढून द्या. आपलें पोट आणखी मारा. परंतु प्रत्येक विद्यार्थ्यानें संपत्तिदान द्यावें. हें जें तुम्ही जमवाल त्याचें पुढें काय ?

संपत्तिदान म्हणजे कांहीं वर्गणी नव्हे. तुम्ही पैसा भूदान-समितीकडे पाठवून द्यावा असें मी इच्छीत नाहीं. सर्वोदय-छात्र-परिषदेकडे पाठवून द्यावा असें हि म्हणत नाहीं. पैसा तुमच्या च जवळ असू द्या. समजा पटना शहरांत दोनशें, चारशें वा जे कांहीं संपत्तिदानी असतील त्यांनीं सर्वांनीं मिळून आपली एक समिति करावी आणि सगळा पैसा तिथें जमा करावा. आणि सगळ्यांनीं मिळून ठरवावें कीं इतका पैसा गोळा झाला आहे, आणि दरमहा इतका गोळा होतो, तेव्हां त्याचा असा-असा उपयोग करावा. एखाद्या चहापार्टींत तर खर्च करायचा नाहीं ना ? सेवाकार्यांत च खर्च करायचा आहे. हें सर्वस्वीं तुमच्यावर सोडलें आहे.

तुम्हांला हवा तसा खर्च करा. दरमहा करा, नाहीं तर एकदम सहा-सहा महिन्यांनीं करा. ही झाली माझी पहिली मागणी संपत्तिदानाची.

दुसरी मागणी म्हणजे समय-दान. तुमचा वेळ आम्हांला हवा आहे. आतां १९५७ सुरू आहे. म्हणून कमींत-कमी एवढें वर्ष तरी तुम्ही भूक्रांतीसाठीं द्या. प्रारंभीं प्रत्येक जिल्ह्यांत—निदान कांहीं जिल्हे मिळून तरी—एकएक विद्यार्थि-शिबिर घ्या. शिबिर निदान एक आठवड्याचें असावें. तेथें विचार नीट समजून घ्यावा. कार्य-पद्धति समजावून घ्यावी. नंतर वेगवेगळ्या टोळ्या करून गांवो-गांव प्रचारार्थ पद-यात्रा काढाव्या. शहरांतून हि फिरावें लागेल. पण तूर्त खेडीं आधीं घ्यावीं लागतील. भूदान-साहित्य जवळ बाळगा. त्याचा प्रचार करा. साहित्यविक्रीबरोबर च ‘साम्ययोग’, ‘भूदान-यज्ञ’ अशा भूदान साप्ताहिकांचे ग्राहक करा. भूदानावर व्याख्यानें द्या. कोठें झाडांखालीं बसून, तर कोठें दारोदार, किसान लोकांना भूदान-विचार समजावून सांगा. भूदान-गीतें गाऊन दाखवा, भूदानासंबंधीं घोषणा करा. भूदान, संपत्तिदान प्राप्त करा. भू-वितरण करा, ग्रामदान मिळवा. हें सर्व काम तुम्हांला करायचें आहे. परंतु जर तुम्ही स्वतः संपत्तिदान न करतांच मागत फिराल, तर तुमच्या शब्दाचा प्रभाव पडणार नाहीं. तुम्हांला मागायची हिम्मत च होणार नाहीं. म्हणून समयदान करूं इच्छिणारानें तर आधीं स्वतः संपत्तिदान करायला च हवें. अन्यथा अशांचें समयदान घेऊन काय करायचें? ज्यांना विचार समजत नाहीं, व जे त्याप्रमाणें आचरण करीत नाहींत अशांना दुसऱ्याच्या आचार-विचारांमध्यें परिवर्तन कसें करतां येईल? अध्यापकांना हि मी आग्रहपूर्वक सांगत आहें कीं त्यांनीं समयदान करावें.

आपल्या विद्यार्थ्यांच्या टोळ्या बनवून त्यांच्यासह प्रचारासाठीं फिरावें. भूदान-कार्यकर्ते हि सोबत असावे, अध्यापक हि असावे, विद्यार्थी हि असावे. भूदानाच्या, सर्वोदयाच्या घोषांनीं सर्व वातावरण दुमदुमलें पाहिजे, सारा देश गाजला पाहिजे.

माझी तिसरी मागणी अशी कीं, सर्व विद्यार्थी बंधु-भगिनींनीं असा संकल्प करावा कीं यापुढें आपण खादी च वापरूं, मिलचा कपडा, मग तो स्वदेशी मिलचा हि कां असेना, आपण वापरणार नाहीं. नेहमीं खादी च वापरूं. ही मागणी मी तुमच्यापासून कां करीत आहें हें समजावीत बसलों तर मला वेगळें व्याख्यान च द्यावें लागेल. खादी आणि ग्रामोद्योग यांच्या मागें एक संपूर्ण समाज-शास्त्र आहे, एक सामाजिक दर्शन आहे. सर्वोदय व्हावा, सर्वत्र सुखशांति नांदावी, समाज-जीवन विकेन्द्रित व्हावें, या दृष्टीनें समाज-रचना कशाप्रकारची ठेवायला हवी या चर्चेंत मी यावेळीं पडत नाहीं. अगदीं सर्वसामान्य विवेचन च मी सध्यां तुमच्या पुढें करीत आहें. आज टी. टी. कृष्णमाचारी किंवा चिंतामणराव देशमुख ज्या कारणांसाठीं खादीचें समर्थन करीत असतात तेवढ्या च साठीं मी तुम्हांला आज खादी वापरायला सांगत आहें. ते कारण म्हणजे देशांत आढळणारी भयंकर बेकारी. पाश्चात्त्यविद्या शिकलेले विद्वान् हि आतां या निर्णयावर येऊं लागले आहेत कीं आज भारतांतील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठीं ग्रामोद्योग, लघु-उद्योग व गृहोद्योग यांच्याशिवाय अन्य उपाय नाहीं. कृष्णमाचारी व चिंतामणराव देशमुख यांच्यासारखे अर्थ-शास्त्रज्ञ हें च सांगत आहेत.

याचीं अनेक कारणें आहेत. एक कारण म्हणजे देशांत भांडवल फार कमी आहे. वर्षभरांत आपण जेवढें उत्पादन करतों त्यांतून खाण्यापिण्याचा व इतर खर्च वजा जातां जी

शिल्लक राहील ती राष्ट्रीय बचत होय, तें भांडवल होय. त्यापैकीं समाजांतील टाटा-बिडलांपाशीं किती आहे व सामान्य जनतेपाशीं किती, हा प्रश्न निराळा. तो भांडवलाच्या वितरणाचा प्रश्न आहे. परंतु आपल्या देशांत आज एकूण बचत च फार कमी आहे. अशा परिस्थितींत मोठमोठे उद्योगधंदे उभारणें व त्यांच्या-मार्फत देशांतील बेकारांना काम पुरवणें आपणाला शक्य नाहीं. देशांतील आंकडे-शास्त्रज्ञांनीं असा हिशेब लावला आहे कीं एक लहानसा कारखाना——साखरेचा म्हणा कीं कापडाचा——उभारून बेकारी दूर करायची म्हटलें तर दर मजुरामागें कमींत कमी दहा हजार रुपये तरी भांडवल हवें. आणि मोठमोठ्या पोलादासारख्या कारखान्यांसाठीं तर दर मजुरामागें पंचवीस हजार भांडवल हवें. आज कोटयवधि भांडवल खर्चून पोलादाचे मोठे कारखाने तयार होत आहेत व पुढें हि होणार आहेत. यांमुळें कांहीं लाख बेकारांना काम मिळेल. पण देशांत तर कोटयवधि बेकार आहेत. दर माणशीं दहा हजार ते पंचवीस हजार रुपये भांडवल कोठून आणायचें ? एवढें भांडवल देशांत आहे च कोठें ?

आज देशांत उपलब्ध असलेल्या साधनांच्या दृष्टीनें विचार केला तर दुसरी पंचवार्षिक योजना ही कांहीं लहान-सहान योजना नाहीं. पांच वर्षांत ४८०० कोटि रुपये या योजनेवर खर्च व्हायचे आहेत. सार्वजनिक क्षेत्राची च मी गोष्ट करीत आहें. खाजगी उद्योगधंद्यांसाठींचे २३०० कोटि रुपये वेगळे च. सार्वजनिक क्षेत्रा-साठींचे हे ४८०० कोटि रुपये कोठून येणार आहेत, हें मला नीटसे माहीत नाहीं. यापैकीं २४०० कोटि रुपये कर, कर्ज, रेल्वेचा नफा वगैरे रूपांनीं गोळा होणार आहेत. बाकीचे २४०० कोटि कोठून आणणार ठाऊक नाहीं. असें ठरविण्यांत आलें आहे कीं

अनुक्रमांक ४२ ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

१२०० कोट रुपयांची चलन-वाढ करायची. तेवढ्या नोटा छापायच्या ! असें करण्यांत मोठा धोका आहे. याच्या विरुद्ध प्रचार आम्ही करीत नाहीं, परंतु यांत धोका आहे हे सर्व च ओळखून आहेत. नोटा छापीत गेलें आणि त्याप्रमाणांत देशाचें उत्पादन वाढलें नाहीं तर चलनवाढ होते, महागाई वाढते. अशा रीतीनें महान् अनर्थ ओढवेल अशी ही १२०० कोटि रुपयांची घाटचाची अर्थनीति आहे ! बाकीचे १२०० कोटि रुपये कोठून उभारणार ? ८०० कोट रुपये परदेशी कर्ज काढण्याचा विचार आहे. यांत हि धोका आहे. आम्ही याचा हि विरोध करीत नाहीं, पण यांत धोका आहे निश्चित ! अशा रीतीनें ८०० कोटि रुपये कर्ज मिळेल कीं नाहीं, कोठून मिळेल, देशांतून कीं बाहेरून, कांहीं निश्चित नाहीं. आपल्या छोटचाशा पंचवार्षिक योजनेची ही गत आहे. देशांतील एकूण एक बेकारांना मोठ्या उद्योगधंद्याच्या द्वारा रोजगार पुरविणें अशक्य आहे.

खरें म्हणजे आपण हवेंत भराऱ्या न मारतां खालीं जरा जमिनीवर उतरायला पाहिजे. गांधीजी कांहीं प्रतिगामी नव्हते. तुम्ही म्हणाल कीं हें अणु-युग आहे. या युगांत या खादी व ग्रामोद्योगाच्या गोष्टी कशाला ? परंतु नाइलाज आहे, खादी-ग्रामोद्योगांशिवाय दुसरा कांहीं उपाय च नाहीं. आपण काय अमेरिकेचें अनुकरण करूं शकतों ? १० हजार ते २५ हजारचा वर जो अंदाज लिहिला तो देशांत प्रचलित असलेल्या यंत्र-सामग्रीचा आहे. नुकतें च मीं एका वर्तमान-पत्रांत वाचलें कीं तेथील एका लहानशा गॅस प्लांटला ७५ लाख रूपये खर्च आला. आणि त्या कारखान्यांत कामगार किती ? तर फक्त दोन ! ते साधे सुधे मजूर नसून विशेषज्ञ आहेत हें खरें. पण दोन माणसांना काम देण्यासाठीं ७५

लाख रुपये लागले, हें तर खरे ना ? इतकें अवाढव्य भांडवल आपण गुतवू शकूं ? सहज समजण्यासारखी ही गोष्ट आहे. आपल्या देशांत कोटचवधि बेकार आहेत. दुसरा मुद्दा जमीन व माणसें यांच्या परस्पर प्रमाणाचा. अमेरिकेंत दर माणशीं १२ एकर जमीन आहे. आपल्या देशांत फक्त एक एकर, कांहीं प्रांतांत तर याहून हि कमी आहे. हा ढोबळ हिशोब ज्यांना कळत नाहीं ते कसले अर्थशास्त्रज्ञ ? आपल्या देशांत माणसें व जमीन यांचें प्रमाण इतकें विपरीत असतांना आपण काय करायला हवें ! आपली कोटचवधि जनता, ८० टक्के जनता, खेडचांत राहते आहे. खेडचांतील या जनतेच्या मतांवर च आपण राज्य चालवीत आहों. कोणत्या हि लोकशाहींत बहुसंख्य जनतेचें हित च सर्व-प्रथम पाहिलें जातें. मी येथें सर्वोदयाच्या दृष्टीनें विवेचन करीत नाहीं. बहुमताच्या राज्याची गोष्ट करीत आहें. बहुजनाच्या अधिकांत अधिक सुखाची जिथें चर्चा चालते, तिथें ती या ८० टक्के खेडचांतील जनतेची च व्हायला पाहिजे ना ? भारतांतील या ८० टक्के लोकांचें जीवनमान कसें सुधारेल, याचा तुम्हीं कधीं विचार केला आहे का ? शहरांत तुम्ही लोखंडाचे कारखाने सुरू करा, कीं अन्य कोणते कारखाने उभारा; शहरांची संपत्ति किती हि वाढो, ती खेडचांत जाऊन तुम्ही वांटणार तर नाहीं ना ?

तुम्हांला कदाचित् असें वाटत असेल कीं शहरांत पुष्कळसे कारखाने सुरू केले आणि खेडचांतील लोकांना त्यांत काम दिलें म्हणजे खेडचांमधें आज जें प्रमाण—माणसें व जमीन यांचें—आहे तें सुधारेल ! आज दर माणशीं एक एकर जमीन आहे ती दोन एकर होईल व खेडचांतील जनतेचें जीवनमान सुधारेल ! विचार करा, हें शक्य आहे का ? आज जी योजना आंखण्यांत आली आहे,

तिच्यामधें असें नमूद केलें आहे कीं पुढील पांच वर्षांत देशाची लोकसंख्या दरसाल तीन लाख या हिशोबानें दीड कोटि वाढेल; त्या दीड कोटीमधें एक कोट लोक असे असणार की त्यांच्यासाठीं तुम्हांला काम शोधून काढावें लागेल. आजच्या बेकारांच्या संख्येंत एक कोटीची भर पडेल. अशा रीतीनें नोकरी शोधणारांची संख्या दरसाल २० लाखांनीं वाढत जाणार. योजनेच्या पांच वर्षांच्या अवधींत ती एक कोटीनें वाढणार. या सर्वच्या सर्व एक कोटि लोकांना तुम्ही शहरांत काम दिलेंत तरी त्यामुळें खेड्यांचें जीवनमान आहे तसें च राहील. पण हे एक कोट लोक हि शहरांत जाऊं शकणार नाहींत. योजनाकार च सांगत आहेत कीं आज खेड्यांत जी संख्या आहे ती वीस लाखांनीं वाढणार आहे. खेड्यांतील लोकसंख्या कमी होणार नाहीं. मला वाटतें त्यांचा हा हिशेब हि बरोबर नाहीं. जितक्या लोकांना रोजगार देण्याची ते उमदे बाळगतात तेवढ्यांना ते रोजगार देऊं शकणार नाहींत. जमिनीचा आणखी भाव वाढेल. अशा परिस्थितींत खेड्यांतील जनतेचें जीवनमान कसें सुधरणार ?

गांवांतील उत्पादन वाढलें पाहिजे, ग्रामोद्योग चालले पाहिजेत. गांवोगांव काम धंदे द्यावे लागतील. घरोघरीं उद्योग द्यावे लागतील. आज शेतकरी वर्षामधें सहा महिने बेकार असतो. तो सहा महिन्यांची कमाई वर्षभर खातो. त्याला सहा महिने उद्योग द्यावा च लागेल. त्यानें सहा महिने खेड्यांत रहावें आणि सहा महिने शहरांत, असें म्हणण्यांत हि कांहीं अर्थ नाहीं. शहरच्या कारखान्यांत असें सहामाही काम मिळूं हि शकणार नाहीं. याचा स्पष्ट अर्थ हा च कीं खेड्यांतील लोकांना खेड्यांत च रहावें लागणार आहे. शहरांतील उत्पादन-वाढीनें खेड्यांचें जीवनमान

सुधारणारें नाहीं. शहरी मालाचा भाव घटवावा व खेड्यांतील मालाचा वाढवावा, व्यापाराचा कांटा गांवच्या बाजूनें झुकवावा अशी हि योजना योजनाकार कांहीं करायचे नाहींत. रशियासह सर्वत्र आज जो कांहीं विकास झालेला दिसतो, तो सारा खेडेगांवांना लुबाडून च ! शेतकरी सर्वत्र पिळला गेला आहे. त्याच्याकडून नेहमीं स्वस्तांत खरीदलें गेले आहे आणि त्याला नेहमीं महाग च विकलें आहे. व्यापाराचें पारडें हि नेहमीं त्याच्या विरुद्ध च झुकलें आहे. भांडवल निर्माण होणार तें हि खेड्यांना पिळून च. हा धोका हि दिसतो च आहे. म्हणून ग्रामीण जनतेचें जीवनमान सुधारण्याचा अन्य मार्ग आज नाहीं. बेकारांना काम देण्यासाठीं, ग्रामोद्योगासाठीं, जिथें माणशीं रु. १० ते २५ हजार भांडवल लागतें तिथें बासांच्या चरख्यासाठीं दीड रुपया पुरेसा आहे. आठ आण्याचा कापूस आणि दीड रुपयाचा चरखा ! दोन रुपयाच्या भांडवलांत हा धंदा चालू शकतो. रोज आठ तास काम करून मनुष्य सहा आणे कमावूं शकतो. आज बिचाऱ्याला एक कवडी हि मिळत नाहीं. दोन रुपयाच्या भांडवलांत रोज सहा आणे कमाई होऊं शकेल. श्रम जास्त, भांडवल कमी !

तुमच्या ध्यानांत हा मुद्दा आला नाहीं, तर बिचाऱ्या खेड-वळाच्या ध्यानांत कसा येईल ? देशासाठीं तुम्ही त्याग करायला पाहिजे. जो विद्यार्थी मिलचें कापड वापरतो तो विचार च करीत नाहीं. या जमान्यांत गांधीजी खादीच्या गोष्टी करीत ते कांहीं वेडे नव्हते.

अशा रीतीनें मी तुमच्याकडे या तीन मागण्या केल्या आहेत. या मागण्या तुम्ही कानावर घ्याल, मनावर घ्याल आणि या तिन्ही अमलांत आणाल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, [illegible]
अनुक्रम 21975 दि. 1.8.49
REFBK-0006976

# क्रांतीचें आव्हान

हें सारें महान् व उदात्त कार्य आम्हांला बोलावीत आहे. आमची निष्ठा व पुरुषार्थ दाखविण्याकरितां ह्यापेक्षां चांगल्या संधीची मी कल्पना च करूं शकत नाहीं. आपण कोटयवधी आहोंत. काय ह्या कोटयावधी लोकांतून कांहीं हजार हि स्त्री–पुरुष निघणार नाहींत कीं, जे इतके स्वार्थत्यागी, इतके साहसी आणि इतके दूरदर्शी असतील कीं, जे ह्या ऐतिहासिक आंदोलनाला स्वतःला वाहून घेतील ? ह्या प्रश्नाच्या उत्तरावर जगाचें भवितव्य, कमींत कमी भारताचें भविष्य, अवलंबून आहे.

इंग्रजी राज्यांत स्फूर्तिशाली नौजवान सरकारी नोकरीमधें जाण्याचा इन्कार करीत होते. ज्या लोकांच्या मनांत राजकीय महात्वाकांक्षा आहेत त्यांनी लक्षांत ठेवावें कीं विधानसभा किंवा सरकारसुद्धां राष्ट्रनिर्माणाचें काम करूं शकत नाही. तरुणांनीं आपापलें हृदय तपासावें. काय ते आराम-प्रिय जीवन जगूं इच्छितात ? काय ते राजकीय, सामाजिक चढाओढींत–स्पर्धेत–सामिल होऊं इच्छितात ? जे अशा चढाओढींत भाग घेतात ते शेंवटीं जनतेवर स्वार होतात. मला पूर्ण आशा आहे कीं ह्या देशांत असे पुष्कळसे तरुण–तरुणी आहेत जे एका उदात्त ध्येयाकरितां कष्टमय व संकटमय जीवनाला अलिंगन देतील. ही शांत बसण्याची वेळ नाही. मुहूर्त टळून राहिला आहे उद्यां फार उशीर होऊं शकेल.

—जयप्रकाश नारायण

# सर्वोदयी समाजाचें चित्र

लोक विचारतात कीं जो सर्वोदयी समाज तुम्ही बनवूं इच्छितां ह्यांत लक्ष्मी वाढेल कीं कमी होईल ? लोकांना वाटतें विनोबा पायीं चालतो, थोडा कपडा वापरतो व परिग्रह सोडून बसलेला आहे तेव्हां सर्व समाजाला तो आपल्या सारखा च बनवूं इच्छितो. मी लोकांना समजावूं इच्छितों कीं आपल्याला असंग्रहाच्या तत्त्वावर समाज उभा करावयाचा आहे. पण असंग्रहाचा अर्थ लोक समजलेले नाहीत.

आज हिंदुस्थानांत सर्वोदय-समाज नाहीं. संग्रह वाढविण्याचें वेड लोकांना लागलेलें आहे. पण इतकी संग्रहनिष्ठा असून हि ह्यांनीं कितीसा संग्रह केला आहे ? आजच्या संग्रही समाजांत घरांतल्या प्रत्येक माणशीं सरासरी अडीच छटाक दूध पडतें. पण विनोबाच्या असंग्रही समाजांत माणशीं १ शेर दूध राहील. आजच्या संग्रही समाजांत धान्याचा वर्ष भरचा सांठा असेल कीं नाहीं याविषयीं शंका आहे. पण बाबाच्या असंग्रही समाजांत दोन वर्षाचें पूरें धान्य राहील. प्रत्येक घरांत अन्न खूप राहील. तें इतकें राहील कीं त्याला किंमत च राहणार नाहीं. अन्नाची किंमत च काय ? कोणी भुकेला असेल, लोक त्याला खाऊं घालतील. पण कोणी अन्न विकणार नाहीं. डालडा खाणाराला उत्तम तूप खाण्यास मिळेल. कारण विनोबाच्या समाजांत तूप खूप राहील. भाजी भरपूर राहील. कोणाच्या हि घरांत जा, तुम्हांला जेवण मिळेल. विनोबाच्या असंग्रही समाजांत दूध च काय, मधाची हि महानदी वाहील.

सारांश असंग्रही समाजांत विनोबा इतका मोठा संग्रह वाढवूं इच्छितो. लोकांना ह्याची कल्पना नाहीं. पण हा संग्रह अलग-अलग घरांत तो वाढवूं इच्छित नाहीं. तो प्रत्येक घरांत वांटून देऊं इच्छितो. संग्रहाची समान वांटणी होईल. असंग्रह म्हणजे सर्वांत मोठा पण वांटला गेलेला संग्रह. संग्रह खूप राहील. पण तो घरांत नाहीं, समाजांत राहील.

आतां तुम्ही च सांगा कीं अशा प्रकारचा समाज बनणार आहे हें ऐकून तुमचा उत्साह वाढला पाहिजे कीं निराशा उत्पन्न झाली पाहिजे. म्हणून जमीन वांटा; साऱ्या गांवचें एक कुटुंब बनवा कीं लक्ष्मी वाढेल.

—विनोबा